# ६ द्वीपकल्पीय पठारी प्रदेश–मध्यवर्ती उच्चभूमी


६.१. प्राकृतिक रचना

६.२ हवामान

६.३ मृदा

६.४ नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी

६.५ लोकसंख्या आणि वसाहती

६.६ आर्थिक विकास
- शेती
- खाणकाम
- उद्योगधंदे
- वाहतूक

६.७ नैसर्गिक आपत्ती






Highlited by:- www.diac.in

### प्रस्तावना :

'द्वीपकल्प' (Peninsula) हा शब्द दोन लॅटिन शब्दांपासून तयार झाला आहे 'Pene' आणि 'Insula' पहिल्या शब्दाचा अर्थ 'जवळ-जवळ' आणि दुसऱ्या शब्दाचा अर्थ 'द्वीप' असा होतो. म्हणून, (Peninsula) म्हणजेच 'जवळजवळ द्वीपासारखी असणारी भूमी' असा या शब्दाचा अर्थ होतो. हा भूमीचा असा भाग असतो की ज्याच्या तीन बाजू पाण्याने वेढलेल्या असतात. हा भूभाग समुद्रात घुसल्यासारखा दिसतो. उत्तर भारतीय मैदानी प्रदेशाच्या दक्षिणेकडे असलेला भूभाग म्हणजे भारतीय द्वीपकल्प होय. भारतीय द्वीपकल्प हा पृथ्वीवरील सर्वांत प्राचीन भूभागांपैकी एक आहे. प्राचीनकाळापासून त्याच्यात अनेक बदल घडत आले आहेत. भारतीय द्वीपकल्पाचा भाग हा अधिकांश अग्निजन्य आणि रुपांतरित खडकांनी बनलेला आहे. आणि त्याने भारताच्या भौगोलिक क्षेत्राच्या सुमारे ३८% भाग व्यापलेला आहे. भारतीय द्वीपकल्प हे विविध खनिजांचे भांडार आहे. विशेषत: अरवली पर्वत, छोटा नागपूरचे पठार, पूर्व घाट आणि कर्नाटकचे पठार हे खनिजसंपन्न प्रदेश आहेत. मूलत: द्वीपकल्प हा पठारांची एक मालिकाच आहे, प्रत्येक पठाराला वेगळी प्राकृतिक वैशिष्ट्ये आहेत. पश्चिम घाट हा अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर यांच्या जलोत्सारणाला अलग करणारा महाद्वीपीय जल विभाजक आहे. नर्मदा नदीला द्वीपकल्पीय प्रदेशाचे दोन भागात विभाजन करणारी दुभाजक मानतात; (१) मध्यवर्ती उच्चभूमी- नर्मदा नदीच्या उत्तरेला; (२) दख्खनचे पठार- नर्मदा दरीच्या दक्षिणेपासून ते महाद्वीपाच्या टोकापर्यंत.


प्रकरण ६ व ७ मध्ये आपण या विभागांच्या महत्वाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणार आहोत.

### मध्यवर्ती उच्च भूमी :

#### ६.१ प्राकृतिक रचना :

उत्तर भारतीय मैदानांच्या दक्षिण सीमेपासून ते नर्मदा नदीपर्यंतच्या प्रदेशाला मध्यवर्ती उच्चभूमी म्हणतात. त्यात प्रामुख्याने गंगा नदीच्या खोऱ्यातील काही भाग समाविष्ट आहे. अरवली पर्वतरांगा, पूर्व राजस्थानाची उच्चभूमी, माळवा पठार, बुंदेलखंड, बाघेलखंड, छोटा नागपूरचे पठार, विंध्य पर्वतरांग हे मध्यवर्ती उच्चभूमी प्रदेशाचे उपविभाग आहेत. या प्राकृतिक विभागात उगम पावणाऱ्या नद्या नैर्ऋत्येकडून ईशान्येकडे वाहतात. यावरुन या प्रदेशाचा सर्वसाधारण उतार लक्षात येतो. मध्यवर्ती उच्च भूमीची रुंदी पश्चिमेकडे अधिक असून, पूर्वेकडे ती कमी होत जाते.

या प्राकृतिक विभागातील काही लक्षणीय भूस्वरुपे म्हणजे अरवली पर्वतातील माऊंट अबू, चंबळ नदीच्या खोल घळया अर्थात बिहड, नर्मदा नदीच्या दुतर्फा असलेल्या संगमरवरी अरुंद दऱ्या, मध्यवर्ती पर्वतीय प्रदेशाच्या अतिपूर्वेला असलेला कैमूरचा भित्तीकडा इ. होत.




आकृती क्र. ६.१

Highlited By www.diac.in.



Highlited by:- www.diac.in



अरवली पर्वत

**अरवली पर्वत :** पर्वतांची मालिका असल्याप्रमाणे आज दिसणारा अरवली ही भारतातील अतिप्राचीन पर्वतरांग समजली जाते. ती नैर्ऋत्य-ईशान्य दिशेत पसरली आहे. नैर्ऋत्येला तिची रुंदी अधिक असून ईशान्येकडे ती अरुंद होत गेली आहे. अरवली मधील मुख्य भाग हा माऊंट अबू आणि अजमेर यांच्यामधील डोंगरांच्या रूपात आहे; त्यात या डोंगर रांगांमधील सर्वांत उंच शिखर 'गुरुशिखर' आहे. ईशान्येकडे जसजसे जावे, तसतसे या डोंगरांची उंची कमी कमी होत जाते आणि पुढे तर ती तुटक डोंगरांप्रमाणे दिसू लागते. बनास नदीच्या जोरदार प्रवाहामुळे पूर्वेकडील उताराची आणि लुनी नदीमुळे पश्चिमेकडील उताराची धूप झाली आहे, त्यामुळे अरवली पर्वतरांग खूप मोठ्या प्रमाणात झिजली आहे. अर्थातच, ही झीज पूर्वेकडील उतारावर जास्त प्रमाणात झाली आहे. त्यामुळे अरवली पर्वतरांगेचा मधला भाग जास्त अरुंद झाला आहे आणि त्याचा आकार डमरू सारखा झाला आहे. अरबी समुद्र आणि बंगालचा उपसागर यांच्या जलोत्सारणाच्या जल विभाजकाचा एक भाग म्हणजे या पर्वतरांगा आहेत.



अरवली पर्वत रांगा

**पूर्व राजस्थानची उच्चभूमी :** अरवली पर्वतरांगांच्या पायथ्यापासून पूर्वेकडे पूर्व राजस्थानची उच्चभूमी पसरलेली आहे. इतरत्र असलेल्या सपाट जमिनीवर अरुंद कमी उंचीच्या टेकड्या नैर्ऋत्य ईशान्य अशा पसरल्या आहेत. या भागाची सरासरी उंची सुमारे ३०० मी. आहे. काही टेकड्यांची उंची सुमारे ६०० मी. आहे. या प्रदेशात बनास नदी वाहते, ती चंबळ नदीची उपनदी आहे. हा प्रदेश म्हणजे अरवली डोंगररांगा आणि मध्य भारत पठार यांच्यातील संक्रमण क्षेत्र आहे. ते पूर्वेकडील मैदानापर्यंत पसरले आहे, तेथे चंबळ आणि सिंध नद्यांचे जलोत्सारण क्षेत्र आहे. या नद्यांच्या प्रवाहाला लागून असलेल्या आणि विशेषतः चंबळ नदीच्या प्रवाहालगत असलेल्या भूभागाचे वैशिष्ट्य म्हणजे खोल कडेकपारी. नद्यांच्या प्रवाहामुळे या कडेकपारी खालपर्यंत कापल्या गेल्या आहेत. चंबळच्या या कडेकपारी 'बिहड' म्हणून ओळखल्या जातात.




Highlited by:- www.diac.in

**बुंदेलखंड :** माळव्याच्या पठाराच्या ईशान्येला असलेल्या प्रदेशाला बुंदेलखंड म्हणतात. तो मध्य प्रदेशचा उत्तर भाग आणि त्याला लागून असलेला उत्तर प्रदेशचा दक्षिण भाग यादरम्यान पसरलेला आहे. या भागात प्रामुख्याने कणाश्म (granite) खडक आढळतो. बुंदेलखंडाचा उत्तर भाग हा लक्षणीयरित्या सपाट असून तो उत्तर भारतीय मैदानी प्रदेशात सहजपणे मिसळलेला आहे. सपाट भूभाग तीव्र उताराच्या पठारांच्या मालिकेने विभागला गेला आहे. अधूनमधून एकेकट्या टेकड्या असलेला सपाट भूप्रदेश असे बुंदेलखंडाच्या एकूण भूस्वरूपाचे वर्णन करता येईल. यमुना नदीच्या खोऱ्याचा एक भाग बुंदेलखंडने व्यापला आहे. सिंध, ही प्रमुख नदी उत्तर दिशेला वाहत जाते आणि यमुनेला जाऊन मिळते.

**माळवा पठार :** मध्यवर्तीय पठाराच्या नैर्ऋत्य भाग माळवा पठाराने व्यापला आहे. या पठाराची सरासरी उंची ५०० मी. आहे. कमी उठाव आणि सलग भूप्रदेश ही याची वैशिष्ट्ये आहेत. माळव्याच्या सपाट भूप्रदेशावर काही ठिकाणी कमी उंचीच्या टेकड्या आहेत, त्या पठारी पृष्ठभागाच्या वर दिसून येतात. माळव्याच्या पठाराचा बहुतांश भाग हा मध्यप्रदेश राज्यात येतो. हे पठार पश्चिमेला अरवली रांग आणि दक्षिणेला विंध्य रांग यांच्यामध्ये येते. या प्रदेशातून मही नदी उगम पावते, ती पुढे गुजरात प्रदेशात जाते. तसेच चंबळ व बेटवा या नद्याही उगम पावतात आणि त्या उत्तरेकडे वाहतात.

**विंध्याचल-बाघेलखंड :** बुंदेलखंडाच्या आग्नेयेला आणि माळवा पठाराच्या पूर्वेला जो प्रदेश तो विंध्याचल-बाघेलखंड म्हणून ओळखला जातो. हा टोन्स, शोण व त्यांच्या उपनद्यांचा प्रदेश आहे. विंध्याचल पर्वताची नैर्ऋत्य-ईशान्य दिशेत कड्यांची एक साखळीच तयार झाली आहे. हे कडे उताराचे असून ते उत्तरेकडे तुटकपणे विखुरलेले आहेत, तर त्या तुलनेत दक्षिणेकडील कडे सलग आहेत आणि त्यांची एक भिंतच तयार झाली आहे.



खजुराहो

विंध्याचलाचा बहुतांश भाग मध्य प्रदेश राज्यात येतो. त्याचा पूर्वेकडील विस्तार उत्तर प्रदेशाच्या पूर्व भागापर्यंत आहे.

विंध्याचलाच्या पूर्वेकडे बाघेलखंड प्रदेश आहे, तो मध्य प्रदेशाच्या पूर्व भागात आणि छत्तीसगढ राज्याच्या उत्तर भागात पसरला आहे. शोण-नर्मदा ही मध्यवर्ती उच्च भूमी आणि दख्खनचे पठार यांच्यामधील प्राकृतिक सीमारेषा मानली जाते. बाघेलखंड प्रांतातून नदीच्या बहुतेक उपनद्या उगम पावतात. त्या आग्नेय दिशेकडून नैर्ऋत्य दिशेकडे वाहतात आणि शेवटी शोण नदीच्या गर्तेला जाऊन मिळतात.

**छोटा नागपूरचे पठार :** या पठाराचा बराच मोठा भाग हा झारखंड राज्यात असून त्याचा विस्तार शेजारील प.बंगाल, छत्तीसगढ आणि ओडिशा राज्यात झालेला आहे. हे पठार देशातील खनिजसंपत्तीने संपन्न प्रदेशापैकी एक आहे. पट्टिताश्म खडक या प्रदेशाच्या मध्यवर्ती भागात मोठ्या प्रमाणात आढळतात. गोंडवननिर्मित खडकातील उच्च प्रतीच्या कोळशामुळे छोटा नागपूरचा प्रदेश हा खनिजसंपन्न झाला आहे.

मूलतः छोटा नागपूरचे पठार हे वेगवेगळ्या स्तरांवर असणाऱ्या पठारांची एक मालिकाच आहे. या पठारांचा पृष्ठभाग सपाट आहे आणि मध्ये कमी उंचीच्या गोलाकार घुमटासारख्या टेकड्यांनी तो सजलेला आहे. पठारांना अलग करणाऱ्या कड्यावरुन वाहणाऱ्या जलप्रवाहांमुळे या पठारावर प्रेक्षणीय धबधबे तयार झाले आहेत.

**विंध्य रांग :** विंध्य रांग ही उत्तर आणि दक्षिण भारतामधील प्रत्यक्ष सीमारेषा म्हणून ओळखली जाते. तिचा विस्तार मध्य प्रदेशाच्या पश्चिम भागापासून ते पूर्वेला बिहारपर्यंत जवळजवळ ११०० किमी आहे. या रांगेची सरासरी उंची सुमारे ४५० ते ६०० मी आहे, पण काही ठिकाणी ती ९०० मी. पेक्षा जास्त आहे. या रांगेत फारशी शिखरे नाहीत. या रांगेची दक्षिण सीमा नर्मदा नदीच्या खचदरीने अधोरेखित केलेली आहे. विंध्य रांगेचे उत्तरेकडील उतार अगदी सौम्य आहेत आणि ते उत्तरेकडे दूरवर पसरलेले आहेत.

## ६.२ हवामान :

द्वीपकल्पीय पठारी प्रदेश विस्ताराने मोठा असल्यामुळे येथील हवामानात मोठे वैविध्य आढळते. पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील शुष्क हवामानाचा भाग वगळता भारतीय द्वीपकल्पातील बहुतांश पठारी प्रदेशात उष्णकटिबंधीय आर्द्र, कोरडे प्रकारचे हवामान आढळते. हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरुवातीचा दीर्घ कालावधी कोरडा असतो या काळात १८° सें. पेक्षा जास्त तापमान असते. उन्हाळा हा खूप उष्ण असतो आणि कमी उंचीच्या अंतर्गत भूभागातील



Highlited by:- www.diac.in

तापमान मे महिन्यात ४५° सें. पेक्षा जास्त असू शकते. जून ते सप्टेंबर दरम्यान पावसाळा असतो आणि वार्षिक पर्जन्यमान ७५० ते १५०० मिमी. असते.

अरवली रांगेच्या पूर्वेकडे मध्य प्रदेश आणि झारखंड राज्यात कोरड्या व दमट उपोष्णकटिबंधीय हवामानाचा अनुभव येतो. पाऊस बहुधा उन्हाळ्यात पडतो आणि हिवाळा सर्वसाधारणपणे कोरडा असतो, उन्हाळा कडक असतो आणि सखल प्रदेशात तापमान ४६° सें. पर्यंत जाऊ शकते. मे आणि जून हे सर्वाधिक तापमानाचे महिने असतात.

## ६.३ मृदा :

बेसॉल्ट खडकापासून बनलेली काळी मृदा मध्यप्रदेशात आढळते. त्यामध्ये चिकणमातीचे प्रमाण अधिक असते आणि ती ओलावा टिकवून ठेवणारी असते.

लाल मृदा अरवली रांगांमध्ये आढळते. या मृदेत नायट्रोजन, फॉस्फरस आणि सेंद्रिय द्रव्ये यांची कमतरता असते आणि लोह भरपूर प्रमाणात असते.

अति पर्जन्य असलेल्या प्रदेशात जांभी मृदा आढळते. पावसाच्या पाण्यामुळे मातीच्या वरच्या थरातील घटक द्रव्ये निचरा होऊन निघून जातात. या मृदेत लोहांशाचे प्रमाण जास्त असते.


## ६.४ नैसर्गिक वनस्पती आणि प्राणीजीवन :

माळवा प्रदेशातील नैसर्गिक वनस्पती म्हणजे उष्णकटिबंधीय शुष्क वने होत, त्यामध्ये विखुरलेली सागाची जंगले आहेत. तेथे मुख्यतः बाभूळ, पळस हे वृक्ष आढळतात. सांबर, काळवीट, चिंकारा हे सामान्यपणे आढळणारे प्राणी आहेत. गेल्या शतकात जलद गतीने जंगलतोड झाली आहे, त्यामुळे पर्यावरणासंबंधी समस्या निर्माण झाल्या आहेत, उदा. पाण्याचे दुर्भिक्ष्य आणि वाळवंटात रूपांतर होण्याची भीती.

मध्यवर्ती उच्चभूमीत कोरडी, पानझडी वृक्षांची वने आढळतात. या पठारावर विविध प्रकारचे अनेक नैसर्गिक अधिवास आढळतात, त्यात प्रामुख्याने साल वृक्षाची वने आढळतात.

येथील वने शुष्क व आर्द्र प्रकारची आहेत. आणि झाडांची उंची सुमारे २५ मी. पर्यंत असते. या पठारावर काही ठिकाणी दलदल आहे. काही भागात बांबूची वने व छोटी झुडपे आढळतात.

येथे आढळणाऱ्या प्राण्यांमध्ये वाघ, आशियाई हत्ती, चार शिंगी सांबर, काळवीट, चिंकारा, रानटी कुत्रा, यांचा समावेश आहे, तर पक्षांमध्ये सारंग आणि धनेश पक्षी (Indian Grey Hornbill) मुख्यतः आढळतात. अर्ध्याहून अधिक वने चरण्यासाठी म्हणून



धनेश पक्षी

साफ केली आहेत आणि खाणकामही मोठ्या प्रमाणावर चालते. त्यामुळे प्राण्यांना वावरणे कठीण झाले आहे आणि हत्ती व वाघ यासारख्या प्राण्यांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे म्हणून पठाराचा काही भाग संरक्षित केला आहे.


## ६.५ लोकसंख्या आणि वसाहती :

छत्तीसगढ राज्याचा अपवाद वगळता द्वीपकल्पीय पठारी प्रदेशात लोकसंख्येची घनता २०० ते ५०० व्यक्ती प्रति चौ.किमी. इतकी आहे, तर छत्तीसगड राज्यात ती १०० ते २०० व्यक्ती प्रति चौ.किमी. आहे (२०११ जनगणना).

Imp या प्रदेशात अनेक जमाती आहेत, उदा. भिल्ल आणि मिनास ह्या जमाती. त्या प्रदेशातील इतर लोकसंख्येपेक्षा त्यांच्या बोलीभाषा आणि सामाजिक जीवन अतिशय वेगळे आहे. ते विविध भाषा बोलतात आणि संस्कृती जोपासतात. राजस्थानच्या मारवाड प्रांतातील एक भटकी जमात, 'गाडिया लोहार' हे लोहारकाम करतात. शेतीची कामे सुरु होण्यापूर्वी ते या प्रदेशाला भेट देतात आणि शेतीची अवजारे व उपकरणे दुरुस्त करुन देतात व विक्रीही करतात.



Highlited by:- www.diac.in




आकृती क्र. ६.२

याप्रदेशात काही काळ मराठ्यांची सत्ता होती, त्यामुळे मराठी समाजही मोठ्या प्रमाणावर आहे. इंदोर आणि उज्जैन येथे मराठी बोलणारे लोक फार मोठ्या संख्येने आहेत. तसेच मोठ्या संख्येने मारवाडी, जाट आणि राजपूत या प्रदेशात राहतात.

प्राचीन काळी उज्जैन ही माळवा प्रदेशाची राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक राजधानी होती. वर्तमानकाळात, सर्वात मोठे शहर व व्यापारी केंद्र म्हणून इंदोर उदयास आले आहे.

या प्रदेशात मिश्र प्रकारच्या ग्रामीण वसाहती आढळतात. प्रदेशाचा उंचसखलपणा, जमिनीची सुपीकता, पाणी-पुरवठा आणि सामाजिक-आर्थिक विकास यावर अवलंबून असतात. अरवली प्रांतातील डोंगराळ भागात वाड्या-वस्त्या मोठ्या प्रमाणावर विखुरलेल्या आहेत, मेवाड, मारवाड आणि अल्वर जिल्ह्यांमध्ये लांब अरुंद दऱ्यांच्या तुटक डोंगरांमध्ये शेतीजवळच्या एकएकट्या वसाहती दिसून येतात.

मोठ्या प्रमाणावर विच्छेदित आणि घळ्यांची मालिका असलेल्या बुंदेलखंडमध्ये मोठी दाटीवाटीने घरे असलेली गावे सुरक्षित ठिकाणी वसलेली आहेत. विदीर्ण भूमीच्या घळ्यांच्या प्रदेशात विखुरलेल्या वसाहती आहेत. सुपीक मृदा असल्यामुळे माळवा प्रदेशात समूहरूपाने मोठ्या वसाहती स्थापन होण्यास मदत झाली आहे.

छोटा नागपूरच्या पठारावर ग्रामीण वसाहतींमध्ये अनेक प्रकार आणि आकृतिबंध दिसून येतात.

बाघेलखंड पठार आणि छत्तीसगढच्या मैदानी प्रदेशात बंदिस्त आणि समूह स्वरुपाच्या वसाहती सुपीक व सपाट प्रदेशामुळे विकसित झाल्या आहेत.

## ६.६ आर्थिक विकास :

बुंदेलखंड आणि त्याच्या आसपासचा प्रदेश भूमी, वने आणि खनिजे या साधनसंपत्तीच्या दृष्टीने संपन्न आहे. हे क्षेत्र शेती, उद्योग यामध्ये इतरांपेक्षा खूप मागासलेले आहे.

### शेती :

द्वीकल्पीय पठारावरील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे. कापूस आणि सोयाबीन ही महत्त्वाची नगदी पिके येथे घेतली जातात.


इतर जिल्ह्यांची अर्थव्यवस्था मुख्यत्वे शेतीवर अवलंबून आहे. परंतु, जमिनीची नापीकता, कमी उत्पादकता, सिंचन सुविधांचा अभाव आणि आधुनिक पद्धतींचा वापर न करणे या बाबींमुळे शेतीचा विकास खुंटला आहे.




Highlited by:- www.diac.in

या प्रदेशात घेतली जाणारी इतर पिके म्हणजे गहू, भात, ज्वारी, मका, बाजरी, हरभरा, मूग, उडीद, आणि सोयाबीन प्रमुख पिके आहेत.

भारताचे द्वीकल्पीय पठारी प्रदेश सिंचनासाठी पावसावर अवलंबून आहे. बुंदेलखंडातील सिंचनाचे मुख्य स्रोत हे विहिरी असून विहिरीतील पाणी पावसावर अवलंबून असते.




आकृती क्र. ६.३




आकृती क्र. ६.४



Highlited by:- www.diac.in

पाण्याचा दुसरा मुख्य स्रोत आहे तलाव. हे तलाव जिल्ह्यात सर्वत्र पसरले आहेत, आणि पिण्याच्या पाण्याचे व सिंचनाचे ते प्रमुख स्रोत आहेत. या प्रदेशातील जलस्तर तसेच विहिरींमधील पाण्याची पातळी पूर्वीपासून अस्तित्वात असलेल्या तलावांमुळे कायम राखली जाते.

### खाणकाम :

माळवा पठरावर पांढरा व लाल रंगाचा पाटीचा दगड सापडतो. पन्ना जिल्ह्यात हिऱ्याच्या खाणी आहेत. बुंदेलखंड खनिज संपत्तीसाठी प्रसिद्ध आहे. बुंदेलखंडात कणाश्म, वालुकाश्म आणि इतर मौल्यवान दगड आढळतात. खतनिर्मितीसाठी उपयोगी असणारा फॉस्फेट ललितपूर आणि छत्तरपूर प्रदेशात सापडतो. तसेच ललितपूर मध्ये अतिशय कमी प्रतीचे लोह खनिज सापडते.

छोटा नागपूरच्या पठारावर खाणकाम चांगल्या रितीने विकसित झाले आहे. कारण तेथे खनिजांचा प्रचंड साठा आहे. उदा. अभ्रक बॉक्साइट, तांबे, चुनखडक, लोहखनिज आणि कोळसा. दामोदर खोरे हे कोळशाच्या खाणींसाठी प्रसिद्ध आहे आणि स्वयंपाकासाठी लागणाऱ्या कोळशाचे देशातील प्रमुख उत्पादन केंद्र म्हणून हा प्रदेश ओळखला जातो. दामोदर नदीच्या खोऱ्यात झारिया, राणिगंज, पूर्व व पश्चिम बोकारो आणि रामगड ही प्रमुख कोळसा क्षेत्रे आहेत. मध्यवर्ती खोऱ्यात कोळशाचे प्रचंड साठे सापडले आहेत.

### उद्योगधंदे :

वस्त्रोद्योग हा माळवा प्रदेशातील एक प्रमुख उद्योग आहे. वस्त्रोद्योगाच्या मोठ्या वसाहती इंदोर आणि उज्जैन येथे आहेत. आदिवासी लोकांसाठी हस्तकलेच्या वस्तू हे उपजीविकेचे साधन आहे. रतलामचे लाखकाम, इंदोर येथे तयार होणाऱ्या चिंध्यांच्या बाहुल्या आणि इंदोर, उज्जैन व इतर अनेक केंद्रांवर तयार होणाऱ्या कागदाच्या लगद्यापासून बनणाऱ्या वस्तू सर्वत्र प्रसिद्ध आहेत.

आता अनेक मोठ्या आणि मध्यम उद्योगधंद्यांची केंद्रे विकसित झाली आहेत. इंदोरला डिझेल इंजिन तयार करण्याचा मोठा उद्योग आहे. इंदोरजवळील पितमपूर येथे गाड्या तयार करणाऱ्या उद्योगांचे मोठ्या प्रमाणावर केंद्रीकरण झाल्यामुळे ते औद्योगिक शहर म्हणून ओळखले जाते. इंदोर हे शहर मध्य प्रदेशचे व्यापारी केंद्र म्हणून ओळखले जाते आणि ते वस्त्रोद्योग आणि शेतीवर आधारित उत्पादनांचे प्रमुख केंद्र आहे.

### वाहतूक :

मध्यवर्ती उच्च भूमी प्रदेशाच्या अधिकांश भागात बस आणि रेल्वे मार्ग विस्तारलेले आहेत. जबलपूर, इंदोर आणि भोपाळ या शहरांमध्ये आंतरराज्य बस स्थानके आहेत आणि रस्त्यांचे उत्तम जाळे आहे.

रेल्वेचे जाळे संपूर्ण प्रदेशभर पसरले आहे. जबलपूर हे भारतीय रेल्वेच्या पश्चिम मध्य रेल्वे क्षेत्राचे मुख्यालय आहे.

### पर्यटन :

बुंदेलखंड आणि बाघेलखंड यांना समृद्ध सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे. बुंदेलखंडमध्ये अनेक किल्ले, राजवाडे आणि मंदिरे आहेत.

प्राचीन संस्कृती आणि परंपरांसाठी प्रसिद्ध असलेला मध्य प्रदेश त्याच्या पुरातल शिल्प, स्मारकांसाठी आणि सर्व धर्मांच्या– हिंदू, मुस्लिम, जैन आणि बौद्धतीर्थ क्षेत्रांसाठी प्रसिद्ध आहे. क्षिप्रा नदीच्या काठी वसलेले उज्जैन शहर कुंभ मेळयासाठी प्रसिद्ध आहे.

## ६.७ नैसर्गिक आपत्ती व पर्यावरण समस्या :

या प्रदेशातील मुख्य पर्यावरणीय समस्या ह्या वृक्षतोड, खाणकाम, औद्योगिकीकरण, वीज निर्मिती, शहरीकरण, वाहनांची वर्दळ आणि विकास प्रकल्प या बाबींशी संबंधित आहेत. या प्रदेशातील वनांची संख्या बेसुमार वृक्षतोडीमुळे घटत आहे. विकास प्रकल्प, खाणकाम आणि वाहतुकीचा विकास. यामुळे बहुमूल्य हजारो हेक्टर वनांचा बळी गेला आहे. काही मौल्यवान वने शेतीच्या विस्तारामुळे नष्ट झाली आहेत.

द्वीपकल्पीय उच्च भूमी हे भारताच्या खनिजसंपत्तीची आणि इंधन स्रोतांची भांडारे आहेत. सुस्पष्ट खाणकाम धोरण नसल्याने खाणमालक पर्यावरणाचा ऱ्हास करीत आहेत. खाण बंद करण्यापूर्वी किंवा दुसरीकडे जाण्यापूर्वी जमीन पुन्हा पूर्वीसारखी सपाट करण्याला किंवा नवीन वृक्षांची लागवड करण्याला ते बांधील नाहीत. खाणींच्या जवळ राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर खनिजांचे कण, धूळ, स्फोट, खाणीतील आगी इ. चे दुष्परिणाम होतात.

या प्रदेशात अनेक औष्णिक प्रकल्प आणि कोळसा प्रकल्प आहेत. विद्युत प्रकल्पातून निघालेले टाकाऊ पदार्थ आजूबाजूचे जलस्रोत आणि जलसाठे प्रदूषित करतात.



Highlited by:- www.diac.in

# ७ द्वीपकल्पीय पठारी प्रदेश-दख्खन

७.१ प्राकृतिक रचना

७.२ हवामान

७.३ मृदा

७.४ नैसर्गिक वनस्पती

७.५ लोकसंख्या आणि वसाहती

७.६ अर्थव्यवस्था
- शेती
- खाणकाम
- उद्योग
- वाहतूक

७.७ पर्यावरणाच्या समस्या





Highlited by:- www.diac.in

## ७.१ प्राकृतिक रचना :

**दख्खनचे पठार** : नर्मदेच्या दक्षिणेला असलेला त्रिकोणी प्रदेश हा दख्खनचे पठार म्हणून ओळखला जातो. हा एक उलटा त्रिकोण आहे, ज्याचा पाया उत्तरेला आहे आणि शिरोबिंदू दक्षिणेला आहे. सातपुडा पर्वतरांग आणि महादेव व मैकल डोंगर मिळून या त्रिकोणाचा पाया बनलेला आहे. मेघालय पठार आणि त्याच्याशी संबंधित ईशान्येकडील डोंगरांचा समूह हा दख्खनच्या पठाराचा एक भाग आहे. दख्खनच्या पठाराच्या मुख्य भागापासून तो गंगेच्या मुखाकडील मैदानामुळे आणि सुंदरबनच्या प्रदेशामुळे अलग झाला आहे. सातपुडा पर्वतरांगांच्या दक्षिणेला असलेल्या दख्खनच्या पठारात अनेक पठारे सामावलेली आहेत. पश्चिम घाट आणि पूर्व घाट या दख्खनच्या पठाराच्या सीमा आहेत.


महाराष्ट्राचे पठार मुख्यतः अग्निजन्य (बेसॉल्ट) खडकांपासून बनले आहे. बेसॉल्ट खडकांचे थर जवळ जवळ क्षितिजसमांतर आहेत आणि त्यामुळे संपूर्ण भूस्वरुपाची रचना पायऱ्यांसारखी झाली आहे. म्हणून या बेसॉल्ट खडकांच्या रचनेला 'डेक्कन ट्रॅप' म्हटले जाते. कर्नाटक-तेलंगणा पठार मुख्यतः कणाश्म आणि पट्टितश्म खडकांनी बनलेले आहे. कर्नाटकाचे पठार 'मैदान' या नावाने ओळखले जाते.

दख्खनच्या पठाराचे पुढील प्रमाणे उपविभाग पडतात.

१) सातपुडा-महादेव-मैकल रांगा

२) महाराष्ट्र पठार

३) कर्नाटक-तेलंगण पठार




आकृती क्र. ७.१



Highlited by:- www.diac.in

४) छोटा नागपूर , महानदीचे खोरे , दंडकारण्य आणि गड़जात डोंगरांनी मिळून बनलेले पूर्वेचे पठार आहे.

### दख्खनचे पठार :

#### १) सातपुडा-महादेव मैकल रांग :

हा डोंगररांगांचा एक समूह असून तो पूर्व-पश्चिम पसरला आहे आणि ही दख्खनच्या पठाराची उत्तर सीमा आहे. या समूहातील सर्वात पश्चिमेकडील रांग म्हणजे सातपुडा पर्वतरांग होय, तिने नर्मदा व तापी नद्यांच्या दरम्यांचे क्षेत्र व्यापले आहे. सातपुडा रांग पूर्व गुजरातपासून सुरू होते आणि पूर्वेकडे ती सुमारे ८०० किमी. पर्यंत पसरली आहे. या रांगेचे उंचीचे सातत्य मध्यभागी कमी झाले आहे. ती बऱ्हाणपूर खिंड म्हणून ओळखली जाते. आणि यातून उत्तर भारताकडे अनेक मार्ग जातात. डोंगरांचा माथा म्हणजे एक प्रकारे पठारच असून त्यांची उंची सुमारे ७०० मी. आहे, तर काही डोंगर ९०० मी. पेक्षा जास्त उंचीचे आहेत. सातपुडा पर्वताचा पूर्वेकडील विस्तार महादेव आणि मैकल रांगांच्या रूपाने दिसून येतो या रांगा अनुक्रमे मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ राज्यांमध्ये आहेत. मैकल रांग साधारणपणे उत्तर-दक्षिण पसरली आहे आणि नर्मदा व महानदीचे खोरे यामधील दुभाजक म्हणून ती काम करते. हे डोंगर समूह नर्मदा, महानदी आणि वैनगंगा या तीन नदी प्रणालींची पाणलोट-क्षेत्रे आहेत.

#### २) महाराष्ट्र पठार :

'डेक्कन ट्रॅप' संरचनेतील बेसॉल्ट खडकांनी दख्खनच्या पठाराचा वायव्य भाग व्यापलेला आहे. तो भाग महाराष्ट्र पठार म्हणून ओळखला जातो. या पठाराच्या पश्चिम सीमेलगत पश्चिम घाट आहे.

लाव्हारस पसरल्यामुळे या क्षेत्रातील बेसॉल्ट खडक तयार झाला आहे, या काळ्या खडकांच्या थराची सर्वात जास्त जाडी



नागपूर-शून्य मैल (भारताचे मध्यवर्ती ठिकाण)



कोल्हापूर-राजवाडा

* Imp

महाराष्ट्र पठाराच्या पश्चिम सीमेजवळ (सुमारे २ किमी.) आहे. असंख्य भेगांमधून लाव्हारस बाहेर पडून पसरला असल्याचे मानले जाते. बेसॉल्ट खडकांच्या क्षितिजसमांतर रचनेमुळे त्या संपूर्ण प्रदेशाला भिन्न उंचीवर असलेल्या सपाट भूभागांच्या मालिकेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्र पठारावरील डोंगरमाथे सामान्यतः सपाट आहेत. पठाराची उंची सुमारे ५०० मी. ते ६०० मी. आहे. या पठाराचा उत्तर भाग तापी नदीच्या खोऱ्याने व्यापला आहे, त्याचा उतार पश्चिमेकडे आहे. तापीच्या दक्षिणेकडील पठाराचा उर्वरित भागाचा सौम्य उतार पूर्व दिशेला आहे आणि त्याने गोदावरी व कृष्णा खोऱ्यांचा वरचा भाग व्यापला आहे.

पश्चिम घाटाच्या अनेक उपशाखा पश्चिम ते पूर्व दिशेकडे जातात आणि विविध नद्यांच्या खोऱ्यांचे दुभाजक बनतात. महाराष्ट्र पठाराचा पूर्व भाग वर्धा-वैनगंगा खोऱ्याने व्यापला आहे. या नद्या साधारणतः उत्तर-दक्षिण दिशेला वाहतात.

#### ३) कर्नाटक-तेलंगणा पठार :


कर्नाटक-तेलंगणा पठार हे दख्खन पठाराचा सर्वात दक्षिणेकडील भाग होय. दख्खनच्या पठाराचा सर्वात मोठा भाग या पठाराने व्यापला आहे. हा स्फटिकमय खडकांचा प्रदेश आहे, मुख्यतः कणाश्म व पट्टिताश्म शिवाय काही रूपांतरित खडकही तेथे आढळतात. या प्रदेशात उत्तरेला गोदावरी व कृष्णा नद्यांच्या खोऱ्यांचा काही भाग असून दक्षिणेला कावेरी नदीचे खोरे आहे. ही दोन विस्तारित क्षेत्रे म्हणजे दोन स्वतंत्र पठारे आहेत. संपूर्ण पठारावर अनेक कमी उंचीच्या आणि गोलाकार कणाश्म खडकांनी बनलेल्या टेकड्या आहेत.

कर्नाटकमध्ये पठारी प्रदेशाला 'मैदान' म्हणतात. मैदानाची सरासरी उंची ४०० मी. आहे. या पठाराचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक


पठारांची उंची ४०० मीटर सरासरी.



Highlited by:- www.diac.in



म्हैसूर राजवाडा



पूर्व भागातील धबधबा (जलप्रपात)

कमी उंचीच्या टेकड्या आहेत. ज्या विविध नद्यांच्या खोऱ्यांचे विभाजन करतात. या पठाराचा सर्वसाधारण उतार पश्चिमेकडून पूर्व दिशेकडे आहे.

तेलंगणाचे पठार हे कर्नाटक पठाराच्या पूर्व आणि ईशान्य दिशेला आहे. या प्रदेशाची पूर्व सीमा ही पूर्व घाट आहे. हा प्रदेश सपाट असून त्यावर काही मोजक्या ठिकाणी घुमटाकार टेकड्या आढळतात. या प्रदेशाची सरासरी उंची ३०० ते ६०० मीटर आहे.

**पूर्वेचे पठार :**

महानदीचे खोरे, दंडकारण्य आणि गहर्जातचे डोंगर हे पठार तीन उपविभागांचे मिळून हे बनलेले आहे. या प्रत्येक उपविभागाची आपण माहिती करून घेऊ.

**महानदीचे खोरे :** छोटा नागपूरच्या पठाराच्या दक्षिणेला तुलनेने कमी उंचीचा प्रदेश आहे आणि तो जवळजवळ सर्व बाजूंनी डोंगर रांगांनी आणि पठारांनी वेढलेला आहे. छत्तीसगढ राज्याचा मध्य भाग आणि ओडिशा राज्याचा पश्चिम भाग या खोऱ्याने व्यापला आहे. त्याच्या पश्चिम सीमेवर मैकल रांगा आणि पूर्व सीमेवर पूर्व घाटाचे डोंगर आहेत. खोऱ्याच्या दक्षिणेला दंडकारण्य पठार आहे. त्याच्या सभोवताली असलेल्या पठारांची किंवा डोंगर रांगांची सरासरी उंची ५०० मी. आहे; तर बहुतेक ठिकाणी सखल प्रदेशाची उंची सरासरी ३०० मी. आहे. या प्रदेशाचा उतार पूर्वेकडे आहे.

**दंडकारण्य :** छत्तीसगढ राज्याचा दक्षिण भाग आणि ओडिशा राज्याचा नैर्ऋत्य भाग दंडकारण्य म्हणून ओळखला जातो. दंडकारण्याचा मध्य भाग हे उंचावलेले पठार असून त्याची उंची सुमारे ७०० ते ८०० मी. आहे. या पठाराचे इंद्रावती नदीमुळे प्रत्यक्षात दोन भाग झाले आहेत. इंद्रावती पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते. दंडकारण्य क्षेत्र हे लोह खनिजाच्या साठ्यांसाठी प्रसिद्ध आहे.

**गहर्जात डोंगर :**

या डोंगरांनी ओडिशा राज्याचा वायव्य भाग व्यापला आहे. या प्रदेशातून ब्राह्मणी आणि बैतरणी नद्या वाहत आहेत.

## ७.२ हवामान :

द्वीपकल्पीय पठाराचा विस्तार मोठा असल्याने हवामानातही विविधता आढळते. द्वीपकल्पाच्या अधिकांश पठारी भागात उष्णकटिबंधीय प्रकारचे हवामान आढळते. हिवाळा आणि उन्हाळ्याच्या सुरूवातीचा दीर्घ कालावधी कोरडा असतो, त्यावेळी तापमान १८° सें. पेक्षा जास्त असते, उन्हाळा हा फार उष्ण असतो आणि अंतर्भागातील प्रदेशात तापमान ४५° सें. पेक्षाही जास्त असू शकते. पावसाळा जून ते सप्टेंबर दरम्यान असतो आणि सरासरी वार्षिक पर्जन्यमान सुमारे ७५० ते १५०० मिमी. दरम्यान असते. फक्त तामिळनाडूचा मध्य-पूर्व भाग या पट्ट्यात ईशान्य मोसमी वाऱ्यामुळे हिवाळ्यात पाऊस पडतो.

कर्कवृत्ताच्या दक्षिणेकडील आणि पश्चिम घाटाच्या पूर्वेकडील भाग आणि निलगिरी पर्वताच्या भाग हा मोठा पट्टा उष्णकटिबंधीय निम-शुष्क प्रकारचे हवामान अनुभवतो. यामध्ये कर्नाटक तामिळनाडूचा पश्चिम आणि अंतर्गत भाग, पश्चिम आंध्र प्रदेश आणि मध्य महाराष्ट्र इत्यादी भागाचा समावेश होतो. हा दुष्काळप्रवण भाग असून येथे अनिश्चित स्वरुपाचा पाऊस पडतो. येथे वार्षिक पर्जन्यमान सरासरी ४०० ते ७५० मिमी. आहे. मार्च ते मे हा उन्हाळ्याचा काळ असतो आणि सरासरी तापमान सुमारे ३२° सें. असते.



Highlited by:- www.diac.in

### ७.३ मृदा :

महाराष्ट्राच्या दख्खन पठारी प्रदेशात पूर्णपणे विकसित झालेली काळी मृदा आहे. ही मृदा विषेशतः कापूस आणि ऊस या पिकांसाठी योग्य आहे.

लाल मृदा तामिळनाडू, कर्नाटकचे पठार आणि आंध्राच्या पठारावर आढळते.

जांभी मृदा सर्वसाधारणपणे पश्चिम घाटात सापडते आणि पठाराच्या पूर्वभागात ही विपुल प्रमाणात आढळते, तामिळनाडूचाही काही भाग या मृदेने व्यापला आहे.


### ७.४ नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी :

वैविध्यपूर्ण प्राकृतिक रचना आणि इतर प्राकृतिक वैशिष्ट्ये यामुळे दख्खनच्या पठारावर विविध प्रकाराची जंगले आहेत. या प्रदेशात विषुववृत्तीय सदाहरित, उष्णकटिबंधिय आर्द्र पानझडी उष्णकटिबंधिय शुष्क पानझडी आणि काटेरी वनस्पती आढळतात. विषुववृत्तीय वने दाट असतात. परंतु ती अतिशय मर्यादित आहे. या जंगलातून, साग, साल शिसम, चंदन, खैर, हिरडा आणि अर्जुन हे वृक्ष आढळतात. चंदन हा उच्च व्यापारी मूल्य असलेला वृक्ष आहे. वाढत्या लोकसंख्येचा शेतीवर पडणारा ताण, शेत जमिनीचा विस्तार आणि खाणकाम यामुळे जंगले नष्ट होऊ लागली आहेत.

पठारावरील जंगलात हरीण, चारशिंगी सांबर, काळवीट, गवा, रानरेडा, इत्यादी गवत खाणारे प्राणी आढळतात. याशिवाय, वाघ रानटी कुत्रा, अस्वल हे मांसाहारी प्राणी आढळतात. सरपटणाऱ्या प्राण्यांचे हे माहेरघर आहे. या प्रदेशातील 'शेकरू' चे अस्तित्व धोक्यात आले आहे. या प्रदेशातील सुमारे ३०० पक्षांच्या जातींचे आस्तित्व धोक्यात आले आहे.

### ७.५ लोकसंख्या आणि वसाहती :

दख्खन हे अनेक भाषा व वेगवेगळ्या लोकांचे माहेरघर आहे. पठाराच्या उत्तर आणि ईशान्य सीमांजवळ भिल्ल आणि गोंड जमातीचे लोक राहतात, आणि विविध भाषा बोलतात. महाराष्ट्र राज्यातील




आकृती क्र. ७.२



Highlited by:- www.diac.in



संस्कृती

सर्व भागात मराठी भाषा बोलली जाते. आंध्र प्रदेश आणि कर्नाटक मध्ये अनुक्रमे तेलगू आणि कन्नड भाषा बोलली जाते, पठाराच्या दक्षिण भागातील तामिळनाडूत तामिळ ही मुख्य भाषा आहे. केरळ राज्यात म्हणजे पठाराच्या नैर्ऋत्य भागात किनारी प्रदेश व डोंगराळ भागात मल्याळम भाषा बोलली जाते. हैद्राबाद हे दक्षिणेकडील उर्दू भाषेचे केंद्र आहे.

दक्षिणेतील मोठी शहरे म्हणजे, हैद्राबाद आणि बेंगलुरु आहेत. इतर मुख्य शहरांमध्ये कर्नाटकातील म्हैसूर, तामिळनाडूतील कोईमतूर आणि सालेम, महाराष्ट्रातील पुणे, नागपूर, नांदेड आणि औरंगाबाद इत्यादींचा समावेश होतो.


महाराष्ट्रातील पठारी प्रदेश सुपीक, मृदा, चांगला पाणी पुरवठा आणि विकसित शेती यामुळे केंद्रित वसाहती करण्याला अनुकूल ठरला आहे. तसेच डोंगराळ भूभागामुळे काहीशा विखुरलेल्या स्वरूपातील वसाहती या पठारी प्रदेशात दिसून येतात.

दूर अंतर असलेली गावे हे दक्षिण भारतातील कर्नाटकातील उत्तर मैदान प्रदेश आणि आंध्र प्रदेशातील रायलसीमा प्रदेशाचे वैशिष्ट्य आहे. कावेरी आणि तुंगभद्रा नद्यांमधील हा प्रदेश असंख्य तलावांनी व्यापलेला आहे. या प्रदेशात केंद्रित वसाहती आढळतात. विखुरलेल्या वाड्या, वस्त्या ही मलेनाडु भागाची वैशिष्ट्ये आहेत. तामिळनाडूच्या उच्चभूमीवर याच प्रकारची वैशिष्ट्ये आढळतात.

## ७.६ अर्थव्यवस्था :

### शेती :


दख्खनच्या पठारावरील कापूस, ऊस आणि भात ही प्रमुख पिके आहेत. दख्खनच्या पठाराच्या पूर्व भागात प्रामुख्याने भात हे पीक घेतले जाते, तर उत्तर भागात गव्हाचे पीक घेण्यात येते. ज्वारी, कापूस, ऊस व तेलबिया यांचे पीक मुख्यत्वे महाराष्ट्राच्या पठारावर घेतले जाते. तर दख्खनच्या पठाराच्या पश्चिम भागात प्रामुख्याने बाजरीचे पीक घेतले जाते. या पठाराच्या उत्तर भागात कडधान्ये पिकविली जातात.




आकृती क्र. ७.३



Highlited by:- www.diac.in




आकृती क्र. ७.४

आणि ब) ओळीने वर असलेल्या तलावातील झिरपणारे पाणी खालच्या तलावात गोळा होत असते.

शेती हा या प्रदेशातील मुख्य व्यवसाय असल्याने जास्तीत जास्त उत्पादन घेण्यासाठी जलसिंचन फार महत्वाची भूमिका बजावते.

### खाणकाम :

महाराष्ट्राचे पठारावर उद्योगासाठी लागणारी खनिजे विपुल प्रमाणात सापडतात. यामध्ये मँगनिज, कोळसा, कच्चे लोखंड, चुनखडक, तांबे, बॉक्साइट, सिलिका, वाळू आणि मीठ यांचा समावेश होतो. या पैकी बहुतांश खनिजे पूर्वेकडील जिल्ह्यांत मोठ्या प्रमाणात सापडतात. नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये बिटुमिनस प्रकारचा दगडी कोळसा सापडतो.

भंडारा जिल्ह्यातील तलाव म्हणजे त्या प्रदेशातील जलसिंचनाचा कणा आहे. ते अजूनही ऊस आणि भाताच्या सिंचनासाठी महत्त्वाचे आहेत.

बंधारा म्हणजे नदीवर बांधलेली धरणे किंवा मार्गात बदल करण्यासाठी घातलेले बांध होय, त्यामुळे नदीतील पाण्याची पातळी उंचावते आणि पाणी कालव्यांमधून वाहू लागते. पाण्याचा प्रवाह अडवून त्याचा साठा करण्यासाठीही त्यांचा मोठा उपयोग होतो. छोट्या प्रवाहावर बंधारा बांधला असता पावसाळ्यानंतरही काही महिने पाणी पुरवठा सुरू राहतो.

कन्नड भाषेत केरे म्हणून ओळखले जाणारे तलाव हे मध्य कर्नाटक पठारावरील सिंचनाची पारंपरिक पद्धत आहे. एकावर एक बांध घालून पाण्याचा साठा केलेल्या धरणांमधून निघालेल्या कालव्यांद्वारे पाणीपुरवठा होत असतो. किंवा दऱ्यांमधून वाहणाऱ्या प्रवाहावर बांध घालून तलावाची एक साखळी निर्माण केली जाते. एका तलावातून बाहेर पडलेले पाणी दुसऱ्या तलावात येऊन साचत असते. आणि असा संपूर्ण प्रवाह सतत चालू राहतो. सामान्यपणे हे तलाव काही किलोमीटर अंतरावर बांधलेले असतात. यामुळे दोन गोष्टी निश्चितपणे होत असतात. अ) पाणी वाहून वाया जात नाही

### उद्योग :

दख्खन पठारी प्रदेशाचा चांगला औद्योगिक विकास झाला आहे. महाराष्ट्र हे देशातील एक अग्रेसर औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे. कापड गिरण्या उद्योग हा राज्यातील सर्वात मोठा



माहिती तंत्रज्ञान उद्योग




Highlited by:- www.diac.in

आणि जुना उद्योग आहे. तसेच इतर उद्योगांचा विकास झालेला आहे. उदा. साखर उद्योग, वाहन उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स उद्योग आणि अन्न प्रक्रिया उद्योग इत्यादी.

कर्नाटक आणि तेलंगणा पठार खनिजसंपत्तीने समृद्ध आहे. उच्च प्रतीचे कच्चे लोखंड, तांबे, मँगनीज, क्रोमाईट, चिनी माती, चुनखडक महत्त्वाची खनिजे आहेत. कर्नाटकात हे देशातील मुख्य सोने उत्पादक राज्य आहे. याशिवाय अनेक उद्योगधंद्यांचा विकास झालेला आहे. उदा. यंत्रसामुग्री, इलेक्टॉनिक उत्पादने दूरसंचार साधने इत्यादी. राज्यात कणाश्मां खडकाचे समृद्ध साठे आहेत. माहिती तंत्रज्ञान उद्योगांची पुणे व बेंगलुरु ही शहरे लोकप्रिय केंद्रे नव्यानेच भरभराटीला आली आहेत.

### वाहतूक :


या पठारी प्रदेशात रस्ते व रेल्वे जाळे विकसित झाले आहे. राष्ट्रीय महामार्गांनी मुख्य शहरे जोडली जात आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक आहे. त्यांनी औद्योगिक व्यापारी



शहरे जोडली आहेत. बेंगलुरु, हैद्राबाद आणि नागपूर हे महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय विमानतळ या प्रदेशात आहेत.

### पर्यटन :

दख्खनच्या पठारावर नैसर्गिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि धार्मिक महत्त्वाची अनेक पर्यटन स्थळे आहेत. उदा. तामिळनाडूमधील उदगमंडलम् (उटी) आणि महाराष्ट्रातील महाबळेश्वर ही प्रसिद्ध थंड हवेची स्थळे आहेत. बेंगलुरु आणि हैदराबाद ही उद्यानांसाठी प्रसिद्ध आहेत. औरंगाबाद, बिदर, विजापूर, म्हैसूर, पुणे ही ऐतिहासिक शहरे आहेत. याशिवाय पठारी प्रदेशात जगभरातील लोकांना आकर्षित करणारी अनेक पवित्र स्थळे आहेत.



तिरुमला

### ७.७ पर्यावरण समस्या :

पठारी प्रदेशात व्यवसाय मोठ्या प्रमाणात केला जात असल्याने त्याठिकाणी मोठ्या प्रमाणात जल आणि मृदा प्रदूषण होत आहे. जमिनीतून खनिज काढल्यानंतर सदर प्रदेश इतर बाबींसाठी निरुपयोगी ठरतो. या प्रदेशात उद्योगधंद्यात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्यामुळे येथे हवा आणि पाणी यांचेही प्रदूषण होत आहे. पठारी प्रदेशाचा पश्चिम भाग हा भूकंपप्रवण क्षेत्र आहे.

१९९३ साली झालेल्या लातूरमधील भूकंपामुळे अनेक लोक मृत्युमुखी पडले व मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली, कोयना धरणाचा परिसर हा देखील भूकंपप्रवण क्षेत्र आहे.

उद्यानांची
- शहरे — Banglore
Hydrabad.



Highlited by:- www.diac.in

# ८ घाट, किनारी मैदाने आणि द्वीप समूह


८.१ पश्चिम घाट आणि पश्चिम किनारी मैदाने
- ८.१.१ प्राकृतिक पार्श्वभूमी
- ८.१.२ हवामान
- ८.१.३ मृदा
- ८.१.४ नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी
- ८.१.५ लोकसंख्या आणि वसाहत
- ८.१.६ आर्थिक विकास
- ८.१.७ नैसर्गिक आपत्ती

८.२ पूर्वेकडील घाट आणि पूर्व किनारी मैदाने
- ८.२.१ प्राकृतिक पार्श्वभूमी
- ८.२.२ हवामान
- ८.२.३ मृदा
- ८.२.४ वनस्पती आणि प्राणी
- ८.२.५ लोकसंख्या आणि वसाहत
- ८.२.६ आर्थिक विकास
- ८.२.७ नैसर्गिक आपत्ती

८.३ द्वीप समूह
- ८.३.१ प्राकृतिक पार्श्वभूमी
- ८.३.२ हवामान
- ८.३.३ नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी
- ८.३.४ लोकसंख्या आणि वसाहत
- ८.३.५ आर्थिक विकास






Highlited by:- www.diac.in

**प्रस्तावना :**

समुद्रकिनाऱ्यालगतचे प्रदेश अतिपूर्वीपासून मोक्याचे प्रदेश म्हणून महत्त्वाचे आहेत. कोणत्याही देशाच्या त्या नैसर्गिक सीमा असतात. जगभरातील लोकसंख्येच्या निम्मी लोकसंख्या किनारपट्टीच्या प्रदेशात राहते आणि काहींचा असा दावा आहे की एकविसाव्या शतकाच्या मध्यापर्यंत ती कितीतरी पटींनी वाढेल. या प्रदेशात आर्थिक घडामोडींची केंद्रे असलेली कितीतरी महानगरे आहेत. भारताचा किनारपट्टीचा प्रदेशही याला अपवाद नाही. भारतातील सर्वात वरच्या क्रमांकाच्या चार महानगरांपैकी तीन किनारी प्रदेशात आहेत. या ठिकाणी लोकसंख्येची घनता जास्त आहे.


या घटकात आपण पश्चिम आणि पूर्व किनारी प्रदेशांविषयी आणि पश्चिम व पूर्व घाटांविषयी जाणून घेणार आहोत. याशिवाय आपण आपल्या देशांच्या द्वीपासंबंधी अभ्यास करणार आहोत.

## ८.१. पश्चिम घाट आणि पश्चिमी किनारी मैदाने :

सातपुडा पर्वतरांगांच्या दक्षिणेला पसरलेल्या दख्खनच्या पठाराच्या दोन्ही, म्हणजे पश्चिम आणि पूर्व सीमांना घाट आहेत. मात्र, या घाटांचे स्वरूप आणि घाटांपासून ते किनाऱ्यापर्यंतच्या किनारी मैदानांचे स्वरूप यात प्रचंड फरक आहे. त्यामुळे ते दोन्ही प्रदेश वेगळे आहेत असेच मानावे लागते.

### ८.१.१ प्राकृतिक पार्श्वभूमी :

**पश्चिम घाट** – उत्तरेकडील साल्हेर–मुल्हेर शिखरांपासून सुरू झालेला पश्चिम घाट, द्विपकल्पाच्या संपूर्ण लांबी बरोबर अरबी समुद्राला समांतर पसरत गेला आहे; त्याची लांबी सुमारे १६०० किमी. आहे. या घाटाने पठाराची सीमा तयार झाली आहे, त्याला सह्याद्री असे म्हणतात. या घाटाची उंची दक्षिणेकडून उत्तरेकडे कमी




आकृती क्र. ८.१



Highlited by:- www.diac.in

कमी होत जाते. पश्चिमेच्या बाजूला त्याचा उठाव १००० मी. पेक्षा जास्त आहे आणि तो पूर्वेकडच्या बाजूला पठारी प्रदेशात मिसळून जातो. अन्नामलाई डोंगर नावाने ओळखला जाणारा दक्षिण घाट उत्तर मध्य घाटापासून एका मोठ्या खिंडीने वेगळा केला आहे, तिला पालघाट खिंड म्हणतात. सर्व साधारणपणे सह्याद्रीचे पुढीलप्रमाणे भाग पडतात. उत्तर सह्याद्री-महाराष्ट्र पठाराच्या सीमेकडील भाग, मध्य सह्याद्री-कर्नाटकच्या पठाराच्या सीमेकडील भाग, आणि दक्षिण सह्याद्री-पालघाट खिंडीच्या दक्षिणकडील भाग. पश्चिम घाट हा पठाराचा भित्तीकडा असला तरी, त्याची रचना भिंतीसारखी नाही. त्यामध्ये अनेक कमी उंचीचे भाग (खंड) आहेत. किनारी भागात जाण्यायेण्यासाठीचे मार्ग काढण्यासाठी या खिंडीचा उपयोग झाला आहे. उदगमंडलमच्या दक्षिणेला असणारी 'पालघाट' ही सर्वाधिक मोठी खिंड आहे.

संपूर्ण पश्चिम घाटात विविध प्रकारच्या खडक रचना दिसून येतात. उत्तरेकडील घाटात काळा खडक प्रामुख्याने आढळतो, तर मध्य भागात आपल्याला कणाश्म, पट्टीताश्म किंवा इतर प्रकारचे रूपांतरीत अवसादी खडक आढळतात. अगदी दक्षिणेला कणाश्म व पट्टीताश्म खडक प्रामुख्याने दिसतात. तिन्ही भागांमध्ये एक प्रकारचा जांभा खडक दिसून येतो. जांभा खडकात लोह आणि बॉक्साइट यांचे प्रमाण जास्त असते.

घाटाची उंची आणि त्याच्या पश्चिम सीमेवरील उठाव उत्तरेकडे कमी-कमी होत जातो. घाटातील सर्वात उंच शिखर अन्नाईमुडी हे आहे. ते अन्नामलाईच्या डोंगरात आहे. हिमालय पर्वत श्रेणीच्या बाहेर असणारे हे सर्वाधिक उंचीचे शिखर आहे. पश्चिम घाट हे अनेक पठारी नद्यांचे उगमस्थान आहे. उदा. गोदावरी, कृष्णा आणि कावेरी. पश्चिम घाट हा अरबी समुद्र आणि बंगालच्या उपसागराला मिळणाऱ्या नद्यांचा प्रमुख जलविभाजक आहे.

### पश्चिमी किनारी मैदाने :

भारताची पश्चिमी किनारपट्टी आणि तिच्या आजूबाजूचा किनारी प्रदेश तीन भागांत विभागला जाऊ शकतो.

१) गुजरातचा किनारा - यामध्ये दोन मोठ्या आखाती प्रदेशांचा समावेश होतो.

२) कोकण किनारा - असंख्य भूशिर एक मुखी नद्या आणि मध्यम लांबीची पुळण ही या किनाऱ्याची वैशिष्ट्ये आहेत.

३) मलबार किनारपट्टी - खाजणातून लांबवर साचलेले पश्चजल (Backwater) हे या किनाऱ्याचे वैशिष्ट्य आहे.



गुजरातमधील प्रसिद्ध मंदिर

### गुजरातची किनारपट्टी :

भारतात गुजरात राज्याला सर्वात लांब सागरी किनारा लाभला आहे. कच्छमध्ये सपाट जमीन आहे. तेथे काही मध्यम उंचीच्या टेकड्या आढळतात. मात्र, अधिकांश भूभाग दलदलीचा आहे. रण आणि काठीयावाड द्वीपकल्पाच्या मधील हा समुद्राचा उथळ भाग आहे. याठिकाणी अनेक बेटे आहेत. त्यातील काही प्रवाळ खडकांच्या रूपात आहेत. कच्छच्या आखातात सागरी राष्ट्रीय उद्यान विकसित केले आहे. गुजरातच्या किनाऱ्यावरील आणखी एक मोठे आखात म्हणजे खंबातचे आखात आहे. हे आखात काठियावाड द्वीपकल्पाला दक्षिण गुजरातपासून अलग करते. या आखातात साबरमती, नर्मदा आणि तापी या मोठ्या नद्या येऊन मिळतात.

### कोकण किनारपट्टी :


अरबी समुद्र आणि पश्चिम घाट यांच्यामधील जमिनीच्या अरूंद पट्ट्याला कोकण-मलबार किनारपट्टी म्हणतात. या किनार पट्ट्याची रूंदी सुमारे ५० किमी. ते १०० किमी. च्या दरम्यान आहे. या किनारी प्रदेशात पश्चिम घाटापासून किनाऱ्यापर्यंत विस्तारलेल्या भूशिरांची मालिकाच पसरलेली आहे. कोकण किनारा हा अधिकांश खडकाळ किनारा आहे. ही खडकाळ भूशिरे अधूनमधून मध्यम किंवा कमी लांबीच्या पुळणांमुळे, आणि त्यातच पश्चिम घाटाच्या पश्चिमेकडील उतारांवर उगम पावणाऱ्या नद्यांच्या मुखालगत असणाऱ्या खाड्यांमुळे वेगळी झाली आहेत.

पश्चिम किनाऱ्यालगत अनेक किनारी बेटे आढळून येतात. यातील बहुतांश पाण्यात बुडालेल्या खडकाळ मंचाच्या स्वरूपात आहेत (उदा. सेंट मेरी आयलंड)



Highlited by:- www.diac.in

किनारी प्रदेशाकडुन घाटाकडे जाताना पावसाचे प्रमाण जास्त.



कोकण – मुंबईतील प्रसिद्ध राजाभाई टॉवर

**मलबार किनारपट्टी :**

पश्चिम किनाऱ्याच्या अतिदक्षिण भागात तुलनेने सपाट प्रदेश आहेत. खाजणांची निर्मिती व पश्चजल ज्याला स्थानिक भाषेत कायल असे म्हणतात, हे या किनाऱ्याचे वैशिष्ट्य होय. वेंबनाड हे केरळमधील सर्वात मोठे पश्चजल (कायल) क्षेत्र आहे.



पश्चजल

### ८.१.२ हवामान :

पश्चिम घाट आणि त्यालगत असणाऱ्या किनारापट्टीच्या मैदानी प्रदेशाचा पर्जन्यमानावर सर्वाधिक प्रभाव पडतो. पश्चिम घाट संपूर्ण पश्चिम किनारपट्टीला समांतर पसरला आहे आणि नैर्ऋत्य मोसमी वाऱ्यांसाठी तो मोठा अडथळा आहे. या वाऱ्यामुळे या प्रदेशात मोठ्या प्रमाणात पर्जन्य वृष्टी होते. किनारी प्रदेशांकडून घाटाकडे जावे तसे पर्जन्यमान वाढत जाते. घाटक्षेत्रात ते सुमारे ४००० मिमी. असते. 'आगुंबे' येथील सरासरी वार्षिक पर्जन्यमान सुमारे ७६४० मिमी. आहे. ईशान्य प्रदेश वगळता हे भारतातील सर्वांत जास्त पावसाचे ठिकाण कर्नाटक राज्यात आहे. किनारी मैदानी प्रदेशाचे हवामान पावसाळ्यात उष्ण आणि दमट असते. घाट प्रदेशात, हवामान दमट असते, पण मैदानी प्रदेशासारखे उष्ण नसते.

### ८.१.३ मृदा :

जांभी मृदेमध्ये लोहाचे प्रमाण जास्त

पश्चिम घाटातील आणि लगतच्या मैदानी प्रदेशात, विशेषतः दक्षिणी भागात, जांभी मृदा आढळते. ही मृदा तपकिरी लाल रंगाची असून त्यामधे लोहाचे प्रमाण अधिक असते. ही मृदा आम्लधर्मी आहे. मैदानांच्या उत्तर भागात विशेषतः गुजरातच्या मैदानी प्रदेशात गाळाची मृदा आढळते.

आम्लधर्मी जांभी मृदा.

### ८.१.४ नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी :

जास्त पर्जन्यमान, उष्ण व दमट हवामान व त्यामुळे घाट प्रदेशात नैसर्गिक वनस्पतींची भरघोस वाढ झाली आहे. दक्षिण सह्याद्रीतील काही प्रदेशाला उष्ण कटिबंधीय वनांचे वरदान लाभले आहे. दक्षिणेकडे आपण 'शोला' वने पाहू शकतो, यांमध्ये अनेक जातींचे वृक्ष आढळतात. लागवड केलेल्या वनांमध्ये निलगिरी आणि साग (Teak) हे वृक्ष आढळतात. मध्य घाट प्रदेशाच्या आसपास मर्यादित घनदाट जंगले आढळतात.

पश्चिम घाटाच्या दक्षिण भागात वन्य प्राणीजीवनात वैविध्य आढळते. हत्ती, गवे, बिबळे, काळे चित्ते, वाघ, अस्वले, विविध प्रकारची माकडे, रानडुकरे इत्यादी प्राणी या भागात आढळतात.

सध्या पश्चिम घाटात सात राष्ट्रीय उद्याने आणि ३९ वन्यजीव अभयारण्ये आहेत. जैववैविध्य संवेदन क्षेत्राचा पश्चिम घाट एक भाग आहे. हल्लीच पश्चिम घाटातील ३९ ठिकाणांचा समावेश वर्ल्ड हेरिटेज साइट्स मध्ये युनेस्कोने (UNESCO) केला आहे.

किनारी प्रदेशात वनांची घनता आणि विविधता एकदम कमी होते. वनक्षेत्रात काजू व फणसाच्या झाडांची वनीकरण कार्यक्रमांतर्गत लागवड केली जाते. कोकणाच्या उत्तर विभागात, अंजन, कांचन इ. वृक्ष जास्त प्रमाणात आढळतात.

वनक्षेत्रात वनीकरण कार्यक्रम – काजु & फणस



Highlited by:- www.diac.in

कर्नाटक - तोडा, केरळ - कोरागा

### ८.१.५ लोकसंख्या आणि वसाहती :

पश्चिम प्रदेशात लोकसंख्येची घनता, कमी आहे. लोकसंख्या बहुतेक छोट्या छोट्या गावांमधून आणि विखुरलेल्या वाड्यां-वस्त्यांमधून ती विभागली गेली आहे.

पश्चिम घाटात आदिवासींची लोकसंख्या जास्त आहे आणि ती पश्चिम घाटात सर्वत्र पसरलेली आहे. त्यांच्यातील अधिकतर लोक उदरनिर्वाहासाठी वनांवर अवलंबून आहेत. बरेचसे आदिवासी आता हळूहळू शेतीकडे वळू लागले आहेत. महाराष्ट्रात भिल्ल आणि वारली आहेत. कर्नाटकात तोडा आणि केरळात कोरागा अशा आदिवासी जमाती आहेत.


घाट विभागात शहरीकरणाचे प्रमाण खूप कमी आहे. काही थोडी पर्यटनस्थळे आहेत, मात्र अरबी समुद्राच्या लगत असलेल्या किनारी प्रदेशात लोकसंख्येची घनता जास्त आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे किनाऱ्यालगत बंदरांची स्थाने शहरे म्हणून विकसित झाली आहेत. मुंबई आणि त्याच्या शेजारील किनारी जिल्हे ठाणे आणि रायगड, गुजरातमध्ये सुरत येथे लोकसंख्येची घनता अधिक आहे.

### ८.१.६ अर्थव्यवस्था :

शेती :

घाटाच्या उत्तर भागात (अधिकतर महाराष्ट्र प्रांतात) शेती मुख्यतः अरुंद दऱ्या आणि मध्यम उतारांवर केली जाते. उतारांवर शेती पायऱ्यांच्या स्वरूपात केली जाते. भात हे या प्रदेशात घेतले जाणारे मुख्य खाद्यान्न पीक आहे.


बाबा बुदान डोंगरांवरील कॉफीचे मळे, उदगमंडलम् आणि मुन्नार भागातील चहाचे मळे आणि केरळ-तमिळनाडू घाट





आकृती क्र. ८.२



Highlited by:- www.diac.in




आकृती क्र. ८.३




आकृती क्र. ८.४

भागातील मसाल्यांची पिके, हे या भागातील प्रमुख मळ्यांचे प्रकार आहेत. दीर्घकालीन पावसाळा मळ्यांच्या शेतीसाठी पोषक आहे.

पुरेशा पावसामुळे गुजरात मैदानी प्रदेशात ज्वारी आणि बाजरी ही मुख्य पिके आहेत.

कोकणापासून दक्षिणेकडील किनारी पट्ट्यात नारळ व सुपारीच्या बागांचे प्रमाण जास्त आहे. या झाडांची लागवड कमी जागेत होत असली, तरी त्या प्रदेशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांची खूप मदत होते.

### खाणकाम :

खाणकाम हा एक मोठा बिगर-शेती उद्योग घाट प्रदेशात चालतो. बॉक्साइट, मँगनीज आणि लोह यासारखी खनिजे घाटातील विविध भागांमधून काढली जातात. गोवा आणि मध्य सह्याद्रीतील कुद्रेमुख ही पश्चिम घाटातील सर्वात महत्त्वाची खाणीची क्षेत्रे आहेत.

### उद्योग :

प्रत्यक्ष घाटावर जरी उद्योगांचे केंद्रीकरण झालेले नसले तरी किनारी तसेच पठारी प्रदेशातील उद्योगांना घाटातील जलविद्युत प्रकल्प वीजपुरवठा करतात. घाटातील एकमेव मोठे औद्योगिक केंद्र, तामिळनाडूतील कोईमतूर येथे आहे. ते कापडगिरण्या आणि इंजिनिअरिंग उद्योगांचे केंद्र आहे.

पश्चिम किनारपट्टीत अनेक औद्योगिक केंद्रे आहेत. गुजरातमधील अहमदाबाद-सुरत हे देशातील एक मोठे कापड उद्योगांचे क्षेत्र आहे. त्याच्या दक्षिणेला मुंबई-पुणे हा औद्योगिक प्रदेश आहे. या प्रदेशातील उद्योगामध्ये औषधे, वाहतूक साधने, प्लॅस्टिक आणि कृत्रिम (सिंथेटिक) वस्तू, चामड्याच्या वस्तू आणि जहाज-बांधणी यांचा समावेश होतो. सेवा क्षेत्राच्या विकासामुळेही या प्रदेशाची भरभराट झाली आहे. या दोन मोठ्या औद्योगिक क्षेत्रांव्यतिरिक्त अनेक बंदरांची ठिकाणे आहेत, अशा ठिकाणी उद्योगांचा विकास झाला आहे. उदाहरणार्थ - पणजी, मंगलोर, कोझीकोड आणि तिरूवअनंतपुरम.



Highlited by:- www.diac.in

### वाहतूक आणि संदेश वाहन :

या प्रदेशातील वाहतूक व्यवस्थेमध्ये खडकाळ भूभाग, शहरीकरणाचा कमी दर आणि लोकसंख्येच्या कमी घनतेबरोबरच औद्योगिक विकासाचा अभाव, या कारणांनी अडथळे निर्माण झाले आहेत. किनारी प्रदेश आणि पठारी प्रदेश यामधील एक अडथळा म्हणून घाट विभाग ओळखला जातो. तरीसुद्धा खिंडींमुळे दोन्हीकडील प्रदेशात जाणेयेणे सोपे झाले आहे. पठारी प्रदेश आणि किनारी प्रदेश यांना जोडण्यासाठी या खिंडींचा उपयोग रेल्वेनेही करून घेतला आहे. तरीही घाट प्रदेशात रस्ते वाहतूक हेच प्रमुख वाहतूकीचे साधन आहे.

किनारी प्रदेशात रस्त्यांचे चांगले जाळे आहे. किनारपट्टी आणि घाट यांच्या मध्ये रस्ते उत्तर-दक्षिण दिशेला धावतात. राष्ट्रीय महामार्गांना जवळजवळ समांतर धावणाऱ्या कोकण रेल्वेमुळे किनारी प्रदेश हा देशातील इतर प्रदेशांशी जोडला गेला आहे. देशातील बहुतांश औद्योगिक आणि व्यापारी शहरी केंद्रे या मार्गाने जोडली गेली. या प्रदेशातील महत्त्वाची शहरे इतर भागांशी विमानसेवेने जोडलेली आहेत. किनारी जलवाहतुकीचा त्या प्रदेशाला मध्यम स्वरूपाचा फायदा होतो.

### पर्यटन :

घाटावर अनेक थंड हवेची ठिकाणे आहेत. तेथे मोठ्या संख्येने पर्यटक भेटी देत असतात. गुजरातमधील सापुतारा, महाराष्ट्रात महाबळेश्वर, तामिळनाडूतील कोडाईकॅनल आणि केरळ मधील मुन्नार ही काही थंड हवेची प्रसिद्ध ठिकाणे आहेत. याशिवाय अनेक राष्ट्रीय उद्याने आणि अभयारण्येही मोठ्या संख्येने पर्यटकांना आकर्षित करत असतात.

किनारपट्टीत, महाराष्ट्रात श्रीवर्धन व गुहागर, गोव्यात कोळवा आणि कलंगुट, कर्नाटकात कारवार, आणि केरळमध्ये कोवालम



बागलकोट – कर्नाटक (पर्यटन स्थळ)

येथील समुद्र किनारे पर्यटनासाठी प्रसिद्ध आहेत. या निसर्ग पर्यटन केंद्रांच्या शिवाय सांस्कृतिकदृष्ट्या महत्वाची अशी अनेक ठिकाणे आहेत.

### ८.१.७ नैसर्गिक आपत्ती :

पश्चिम घाट प्रदेशात जास्त पाऊस पडतो. त्यामुळे हा जल संपत्तीचा अत्यंत समृद्ध प्रदेश समजला जातो. खडकाळ भूभाग, खोल दऱ्या, मोठ्या प्रमाणात उंच सखलपणा आणि यामुळे येथे सिंचनासाठी, जलविद्युत प्रकल्पांसाठी किंवा शहरांना पाणीपुरवठा करण्यासाठी, धरणे बांधण्यासाठी अनुकूल परिस्थिती आहे. घाट प्रदेशात खनिज संपत्तीचे भरपूर साठे आहेत. घाटात संपन्न जैवविविधता आहे. त्यामुळे, या प्रदेशाचे पारिस्थितीकीय मूल्यही अधिक आहे.

नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध असलेल्या या प्रदेशाला अनेक पर्यावरणाच्या समस्यांनी ग्रासले आहे. नैसर्गिक साधनसंपत्तीचा अतिरिक्त वापर होत असल्यामुळे या प्रदेशातील जैवविविधतेचे जतन करणे खूप कठिण झाले आहे.

किनारी प्रदेशात लोकसंख्येची घनता अधिक आहे. लोकसंख्येच्या वाढत्या दबावामुळे मानवी हस्तक्षेपाचे प्रमाणही वाढत आहे. किनारी परिसंस्था या अत्यंत नाजूक परिसंस्था समजल्या जातात; आणि त्यामुळेच कोणताही हस्तक्षेप पर्यावरणीय समस्या निर्माण करू शकतो.

## ८.२ पूर्व घाट आणि पूर्व किनारी मैदाने :

### ८.२.१ प्राकृतिक पार्श्वभूमी :

#### पूर्व घाट

दख्खनचा पठाराच्या पूर्वेकडील सीमेलगत पूर्व घाटाचे स्थान आहे. पश्चिम घाटाप्रमाणे पूर्व घाट हा भित्तीकडा नसून ती एक स्वतंत्र पर्वतीय प्रणाली आहे. ती कमीअधिक प्रमाणात झिजलेली तुटक पर्वतरांग आहे. ती दक्षिणेतील तामिळनाडूपासून उत्तरेकडे ओडिशापर्यंत पसरली आहे. पठारावरून वाहणाऱ्या पूर्ववाहिनी नद्यांनी ही पर्वतरांग अधूनमधून छेदली आहे. ही पर्वतरांग किनाऱ्याला समांतर पसरली आहे. पूर्व घाटाचे पुढीलप्रमाणे विभाग आहेत, ओडिशा घाट हा पूर्व घाटाचा एक भाग ओडिशा राज्यात येतो. या रांगेत सिमलीपाल हा उत्तरेकडील महत्त्वपूर्ण डोंगर समूह आहे. पूर्व घाटातील मलयगिरी (११७५ मी.) सारखी शिखरे त्याच भागात आहेत. अनेक डोंगरसमूह महानदीच्या उत्तरेकडे आहेत.

कृष्णा आणि गोदावरी नद्यांच्या दरम्यानचा प्रदेश आंध्रामधील पूर्व घाट हे ठळकपणे दिसणारे डोंगर आहेत. या अरूंद पट्ट्यात पूर्व घाट हा छोट्या विखुरलेल्या टेकड्याप्रमाणे दिसतो. कृष्णा नदीच्या



Highlited by:- www.diac.in

दक्षिणेला उत्तर दक्षिण पसरलेल्या नल्लमाला, वेलीकोंडा आणि पालकोंडा या डोंगररांगा आहेत. या रांगांची उंची ३०० ते १३५० मी. च्या दरम्यान आहे.


पूर्व घाटाच्या दक्षिण टोकाला दक्षिण तामिळनाडूमधील कमी उंचीचे सिरूमलाई आणि कारंथामलाई डोंगर आहेत.

**पश्चिम आणि पूर्व घाट यांच्या विलिनीकरणाचा प्रदेश :**

प्राकृतिक रचनेच्या दृष्टीने पूर्व घाट आणि पश्चिम घाट यांचे निलगिरी पर्वतात विलिनीकरण होते असे समजले जाते. पश्चिम घाटाच्या पूर्वेकडे पसरलेली बिलीगीरी डोंगररांग ही जंगल पारिस्थितिकीय दृष्ट्या मुक्त मैदान समजली जाते, जी पूर्व घाट आणि पश्चिम घाट यांना जोडते. भारतातील जंगली हत्तींचे हे दुसऱ्या क्रमांकाचे वसतीस्थान समजले जाते, त्या मुक्त मैदानाचा विस्तार आग्नेयकडे झाला आहे. यामध्ये बिलीगीरी, निलगिरी आणि आग्नेय घाटाचा समावेश होतो.

**पूर्व किनारी मैदाने :** बंगालच्या उपसागराची किनारपट्टी कन्याकुमारीपासून ते सुंदरबनपर्यंत पसरलेली आहे. पूर्व किनारी मैदानाचे वैशिष्ट्य म्हणजे पठारावरुन नद्यांनी निर्माण केले त्रिभूज प्रदेश. गंगा–ब्रह्मपुत्रा नदीप्रणालीमुळे बनलेला त्रिभूज प्रदेश आणि गंगेचा त्रिभूज प्रदेश हे दोन वेगळे विभाग समजले जातात. हा त्रिभूज प्रदेश प्रचंड मोठा आहे. गंगा नदीप्रणालीने वाहून आणलेले पाण्याचे प्रमाणही प्रचंड आहे.

पूर्व घाट आणि किनारपट्टी यांमध्ये रुंद मैदाने आहेत. संपूर्ण किनाऱ्याचे तामिळनाडूचा किनारा, आंध्रचा किनारा आणि ओडिशाचा किनारा अशा तीन भागात विभाजन करता येते.



किनारी मैदान

**तामिळनाडूचा किनारा:** या किनाऱ्याला कोरोमंडलचा किनारा असेही म्हणतात. तो कन्याकुमारीपासून कृष्णा नदीच्या त्रिभूज प्रदेशापर्यंत पसरला आहे. कन्याकुमारी आणि रामेश्वरम द्वीपाच्या मधला किनारा हा मानारच्या आखाताला लागून आहे. आखाती प्रदेशात प्रवाळ भित्ती तयार झाल्या आहेत. मानारचे आखात मोत्यांच्या साठ्यांसाठी प्रसिद्ध आहे. तामिळनाडूच्या किनारी प्रदेशात कावेरीचा त्रिभूज प्रदेश आहे. किनाऱ्याजवळ अनेक खाऱ्या पाण्याची सरोवरे आहेत. त्यातील पुलिकत सरोवर हे सर्वाधिक उल्लेखनीय आहे.

**आंध्र ओडिशा किनारा :** कृष्णा नदीच्या त्रिभूज प्रदेशाच्या दक्षिणेकडून सुरू होतो. या किनारी प्रदेशाची वैशिष्ट्ये म्हणजे कृष्णा गोदावरी आणि महानदी यांचे त्रिभूज प्रदेश आणि चिल्का सरोवर आहे. हे भारतातील सर्वात मोठे खाऱ्या पाण्याचे सरोवर आहे. कृष्णा आणि गोदावरीच्या त्रिभूज प्रदेशाच्या मध्ये कोल्लेरू नावाचे एक गोड्या पाण्याचे सरोवर आहे.

### ८.२.२ हवामान :

पूर्व किनारी मैदाने आणि पूर्व घाट येथील हवामान आणि पश्चिम किनारी मैदाने आणि पश्चिम घाट येथील हवामानात प्रचंड फरक आहे. पश्चिम घाट नैर्ऋत्य मान्सून वाऱ्यांना अडथळा आणतो, तर पूर्व घाट ईशान्य मान्सून वाऱ्यांना अडथळा आणतो. परंतु, त्याची परिणामकारकता फार मोठी नाही. मुख्यतः घाटातील दक्षिण भाग, विशेषतः आंध्र प्रदेश आणि तामिळनाडूच्या भागात हिवाळ्यात पाऊस पडण्यास साहाय्यभूत ठरतो.

### ८.२.३ मृदा:

पूर्व घाटावरच्या मृदा कणाश्म किंवा पट्टीताश्म या प्राचीन खडकापासून तयार झाल्या आहेत. त्या विविध प्रकारच्या लाल रंगांच्या छटांमध्ये दिसून येतात. यामध्ये सर्वात अधिक प्रमाणात आढळणारी मृदा म्हणजे लाल लोम मृदा आहे. ही लोम आणि वालुकामय असल्यामुळे ओलावा धरून ठेवू शकत नाही, त्यामुळे ही मृदा अधिक सुपीक नाही.

पूर्व किनारी प्रदेशात गाळाची मृदा आढळते. हा प्रदेश पूर्ववाहिनी नद्यांच्या मुखालगत असल्याने या प्रदेशातील मृदा दरवर्षी नव्याने तयार होते. त्यामुळे तिच्या सुपीकतेचा दर्जा टिकून राहतो.

### ८.२.४ वने आणि वन्य जीवन :

पूर्व घाट पश्चिम घाटापेक्षा जैविक अभयारण्ये तसेच जैवविविधतेत पूर्णपणे वेगळा आहे. या घाटात मध्यम स्वरूपाचा पाऊस होतो आणि त्यामुळे या प्रदेशातील बहुतांश वने ही उष्णकटिबंधीय आर्द्र पानझडी किंवा उष्णकटिबंधीय कोरडी पानझडी प्रकारची असतात.



Highlited by:- www.diac.in

कावेरी त्रिभुज - वर्षातून तीन वेळा भात पिकवला जातो

पारिस्थितिकीय आणि पर्यावरणीय परिस्थितीत विविधता असल्याने पूर्व घाटात समृद्ध प्राणीजीवन आढळते. आशियाई हत्तीचे ते जगातील सर्वात मोठे वसतीस्थान आहे. मोठ्या प्राण्यांमध्ये बिबटे, सांबर आणि वाघ आढळतात. याशिवाय हा घाट विविध पक्षांच्या जातींसाठी प्रसिद्ध आहे.

### ८.२.५ लोकसंख्या आणि वसाहती :

घाट प्रदेशात लोकसंख्येचे वितरण विरळ आहे, या जिल्ह्यांमध्ये लोकसंख्येची घनता बहुतेक ठिकाणी दर चौरस किमी. ला २०० पेक्षा कमी आहे. शहरीकरणाचे प्रमाणही खूप कमी आहे, याठिकाणी अगदी कमी शहरी केंद्रे आहेत. ती बहुतेक प्रशासकीय केंद्रे म्हणून विकसित झाली आहेत.



संस्कृती आणि परंपरा

याउलट किनारी मैदानी प्रदेशात लोकसंख्येचे एकत्रीकरण झालेले आहे. शिवाय मोठ्या प्रमाणात शहरीकरण झालेले आहे. या प्रदेशातील लोकसंख्येची घनता ३०० प्रति चौरस किमी. इतकी आहे. या प्रदेशातील शहरे बंदराच्या ठिकाणी विकसित झालेली आहेत. आणि त्यांना औद्योगिक पार्श्वभूमी आहे. उदा. विशाखापट्टणम आणि चेन्नई इत्यादी.

### ८.२.६ आर्थिक विकास :

**शेती :**

पूर्व घाट प्रदेश हा आदिवासी जमातींचे सर्वाधिक प्रभावक्षेत्र आहे. घाटातील शेती ही मुख्यत्वे उदरनिर्वाहासाठी केली जाते. अंतर्गत भागात काही ठिकाणी 'स्थलांतरित' पद्धतीची शेती केलेली आढळते. मात्र तामिळनाडू घाटापासून ते ओडिशा घाटांपर्यंत पिकांचा प्रकार तसेच शेतीच्या पद्धती खूप बदलत जातात. जरी बऱ्याच ठिकाणी भात हे मुख्य पीक असले तरी कडधान्य काही ठिकाणी तेलबिया ही महत्वाची पिके आहेत. पूर्व किनारी मैदाने ही आपल्या देशातील काही सुपीक प्रदेशांपैकी एक प्रदेश आहे. विशेषतः कावेरीच्या त्रिभूज प्रदेशात भात वर्षातून तीनदा पिकविला जातो. सर्व त्रिभूज प्रदेश आणि त्याला लागून असलेल्या किनारपट्टी आणि घाट यांच्यामधील मैदानी प्रदेशात भात पिकाचे वर्चस्व दिसून येते.

**खाणकाम :**

प्राचीन प्रस्तरांचा प्रदेश असल्याकारणाने अग्निजन्य आणि रूपांतरित खडकांचे येथे प्राबल्य आहे. त्यामुळे पूर्व घाट आर्थिक दृष्ट्या महत्त्वाच्या खनिजांनी समृद्ध आहे. आंध्राच्या घाटात कडाप्पा खडक विपुल प्रमाणात आहेत. इमारत बांधकामाच्या दृष्टीने त्यांना प्रचंड मागणी आहे. तसेच कणाश्मा खडकाचे निर्यातमूल्यही अधिक आहे. छोटा नागपूरच्या पठारात विलीन होणाऱ्या घाटाच्या उत्तर भागात लोहखनिज, मॅंगनीज आणि बॉक्साईट ही खनिजे सापडतात.

पूर्व किनारी मैदानात किनाऱ्यापासून लांब समुद्रात तेलसाठे असण्याची मोठी शक्यता आहे.

**उद्योगधंदे :**

पूर्व घाटात उद्योगधंद्याचा योग्य विकास झाला नसला तरी पूर्वेकडील किनारपट्टी औद्योगिक दृष्ट्या विकसित आहे. किनारपट्टीच्या प्रमुख शहरातून महत्वाचे निर्मिती उद्योग विकसित झाले आहेत. उदा. अभियांत्रिकी उद्योग, मोटार उद्योग, टायर उद्योग इ. चेन्नई आणि विशाखापट्टणम् शहरामध्ये, जहाजबांधणी, माहिती आणि तंत्रज्ञान निर्मिती, रसायनिक आणि स्वयंचलित वाहने इत्यादी उद्योग येथे विकसित झाले आहेत.

**वाहतूक/दळणवळण :**

घाट विभागातील रस्ते आणि रेल्वे यांचे जाळे अपेक्षेनुसार विकसित झालेले नाही. याचे मुख्य कारण भूभागाचा उंचसखलपणा आणि आर्थिक विकासाचा निम्न स्तर. याउलट, पूर्व किनारी मैदानी प्रदेशात रस्ते व रेल्वे यांचे जाळे चांगल्या रीतीने विकसित झाले आहे. कोलकाता आणि चेन्नई यांना जोडणारा 'सुवर्ण चतुष्कोन' (Golden Quadrangle) बराच भाग या प्रदेशातून जातो. या प्रदेशात लोकसंख्येची घनता जास्त आहे. जमिनीचा उठाव कमी आहे. शहरीकरणाचे आणि औद्योगिकीकरणाचेही प्रमाण अधिक आहे. हे घटक वाहतुकीच्या विकासाला पोषक ठरले आहेत. या भागात किनारी जलवाहतूक सेवाही चालते. महत्त्वाची शहरे उदा., चेन्नई, विशाखापट्टणम हवाई मार्गांनी जोडलेली आहेत. चेन्नई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे.



Highlited by:- www.diac.in

### ८.२.७ नैसर्गिक आपत्ती आणि पर्यावरणीय समस्या :

पूर्व किनारी मैदानांना उष्णकटिबंधीय चक्रिवादळांचा नेहमीच धोका असतो. अशा प्रकारच्या घटना या भागात पूर्वीही घडल्या आहेत आणि नजिकच्या भूतकाळातही घडल्या आहेत. २००० सालचे प्रचंड चक्रीवादळ आणि २००४ सालचे त्सुनामी आक्रमण या दोन मोठ्या घटना होत्या. त्यांनी किनारी मैदानांचा मोठा प्रदेश उध्वस्त केला.

पूर्व किनारी मैदानी प्रदेशात औद्योगिक विकासाचा उंचावलेला स्तर आणि लोकसंख्येचे केंद्रीकरण यामुळे पर्यावरणाच्या अनेक समस्या उभ्या राहिल्या आहेत. विशेषतः ओडिशा आणि तामिळनाडू या किनारी भागातील वाढत्या प्रदूषणामुळे किनारी परिसंस्था धोक्यात आल्या आहेत.



त्सुनामी

घाट विभागात खनिजांचे समृद्ध साठे आहेत आणि खाणकामांमुळे त्या भागातील जैविक संसाधनास हानी पोहोचत आहे.

### ८.३ बेटे :

भारतीय क्षेत्रात भारताच्या मुख्य भूमीशिवाय बेटांच्या दोन समूहांचा समावेश होतो, ते दोनही समूह मुख्यभूमीपासून दूर आहेत. (अ) अरबी समुद्रातील लक्षद्वीप-समूह (ब) बंगालच्या उपसागरातील अंदमान-निकोबार समूह (क) भारताच्या मुख्य भूमीच्या किनाऱ्यालगत असलेली किनारी बेटे हा तिसरा समूह ग्राह्य धरता येतो. अगदी कमी क्षेत्र व्यापणारे हे द्वीपसमूह असले, तरी सर्व द्वीपसमूहांचे स्थान लष्करीय दृष्टीकोनातून अत्यंत महत्त्वाचे आहे.

### ८.३.१ प्राकृतिक पार्श्वभूमी :

#### प्राकृतिक रचना :

भारताच्या मुख्यभूमीपासून दूरवर असलेल्या या दोन्ही द्वीपसमूहाची प्राकृतिक वैशिष्ट्ये अतिशय भिन्न आहेत. दोन्ही समूहाचे स्थान उष्ण कटिबंधीय सागरांमध्ये आहे.

उष्ण आणि नितळ स्वच्छ पाणी प्रवाळांच्या वाढीसाठी उपयुक्त असते. या दोन्ही द्वीपसमूहात आपल्याला जिवंत प्रवाळांच्या वसाहती दिसतात. प्रवाळ हे तापमानातील बदलांच्या प्रती खूप संवेदनशील असतात, समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानात झालेल्या थोड्या बदलानेसुद्धा त्यांचे विरंजन होते. त्यामुळे प्रवाळ हे जागतिक हवामान बदलाचे अतिसंवेदनक्षम निर्देशक आहेत.

#### अ) अरबी समुद्रातील लक्षद्वीप समूह :

हा अरबी समुद्रात एकवटलेला ३६ बेटे, उपखाड्या किंवा शैलभित्तीचा एक समूह आहे. जलमग्न पर्वतीय रांगेचे अतिउत्तरेकडील भाग म्हणजे अरबी समुद्रातील लक्षद्वीप, मालदीव आणि छागोस द्वीपसमूह.

पुढे दिलेला नकाशा अभ्यासा. त्यात भारताच्या मुख्यभूमी सोबत लक्षद्वीप बेटांचा समूह दाखवला आहे. उत्तर-दक्षिण




आकृती क्र. ८.५



Highlited by:- www.diac.in

पसरलेल्या समुद्रांतर्गत डोंगररांगांचा तो वरचा भाग आहे, हे तुमच्या लक्षात येईल.

या द्वीपांची उत्पत्ती प्रवाळांपासून झाली आहे, ते ज्वालामुखीच्या शिखरांभोवती तयार झाले आहेत, असा अंदाज आहे ते प्रवाळद्वीप किंवा शैलभित्ती स्वरूपात आहेत. सर्वसाधारणपणे अधिकांश-द्वीपांची प्राकृतिक रचना एकसारखी आहे. या द्वीपांच्या पश्चिमभागात मोठे खाजण आहेत. तुलनेने खाजणांच्या द्वीपांची मुख्य भूमी अगदीच नगण्य आहे. खाजणांच्या भोवती शैलभित्ती आहेत. कोणत्याही द्वीपावरची भूमी समुद्रसपाटीपासून ५ मीटरपेक्षा उंच नाही आणि काही द्वीप आणि शैलभित्ती ओहोटीच्या काळातच दिसतात. तेथे डोंगर किंवा नदीप्रवाह नाहीत.

**ब) अंदमान निकोबार बेटे :** – 572-38

या द्वीपसमूहात विविध आकारांची तब्बल ५७२ बेटे समाविष्ट आहेत, त्यापैकी ३८ बेटांवर मानवी वसाहती आहेत. या बेटांना सामान्यतः जरी अंदमान-निकोबार बेटे म्हणत असले तरी हे दोन वेगळे समूह आहेत आणि ते एका खोल खाडीने विभागले गेले आहेत, याला दहाअक्षांश खाडी असे म्हणतात. प्राकृतिक रचनेच्या दृष्टीने हे दोन समूह अतिशय भिन्न आहेत. अंदमान आणि निकोबार मध्ये प्रवाळ हे कमी-अधिक प्रमाणात काही बेटांच्या भोवती झालरी प्रमाणे दिसणाऱ्या शैलभित्तीच्या स्वरूपात आहेत, परंतु अंदमान समूहात प्रवाळांची बेटे आढळत नाहीत.

**अंदमान समूह :** → प्रवाळांची बेटे नाहीत

अंदमान बेटांचे दोन भाग आहेत, एक आहे मोठे अंदमान आणि दुसरे लहान अंदमान. अरूंद खाड्यांनी मोठे अंदमानचे उत्तर अंदमान-मध्य अंदमान आणि दक्षिण अंदमान असे विभाजन केले आहे. अंदमान बेटे ही बेटांची एक साखळी आहे, जी उत्तरेपासून दक्षिणेकडे पसरलेली आहेत. ही सर्व बेटे जलमग्न पर्वत शृंखलेची शिखरे आहेत. प्रत्येक बेटाच्या मध्यभागी उंच प्रदेश आहे त्याच्या बाजूने सपाट प्रदेश आहे, ज्याला सर्व बाजूंनी उतार आहे आणि शेवटी किनारपट्टीत तो विलीन झाला आहे. मध्य अंदमानच्या पूर्वेला असणारे बॅरन बेट हा भारतातील एकमेव जिवंत ज्वालामुखी आहे. बॅरन बेट – ज्वालामुखी

**निकोबार समूह :**

'दहाअक्षांश खाडी' च्या दक्षिणेला असलेला निकोबार हा वैशिष्ट्यपूर्ण बेटांचा समूह आहे. त्यात २२ बेटे असून त्यातील १० बेटांवर वस्ती आहे.

निकोबार – 22 – 10




आकृती क्र. ८.६

**क) किनारी बेटे :**

वर उल्लेखिलेल्या दोन द्वीपसमूहाव्यतिरिक्त भारताच्या किनाऱ्यालगत अनेक बेटे आहेत. त्यातील काही अगदी लहान आहेत आणि किनाऱ्यापासून काही किमी. अंतरावर आहेत.

कच्छच्या आखातातील बेटे ही बहुतांश झालरीसारख्या प्रवाळांच्या शैलभित्तींच्या स्वरूपात आहेत. कोकण आणि मलबारच्या किनाऱ्यालगत अनेक छोटी बेटे आहेत.



Highlited by:- www.diac.in

सागापेक्षा मजबूत - महोगनी लाकूड.

बंगालच्या उपसागराच्या किनाऱ्यालगत मोठ्या संख्येने अवसादी बेटे आहेत.

### ८.३.२ हवामान :

लक्षद्वीप या बेटांचे हवामान उष्णकटिबंधीय स्वरूपाचे आहे. ते उष्ण व दमट अथवा उपोष्ण प्रकारचे आहे. उन्हाळ्यात तेथील तापमान २२° सें. ते ३५° सें. असते तर हिवाळ्यातील तापमान २०° सें. ३२° सें. असते. समुद्री वाऱ्यांमुळे त्या ठिकाणी प्रसन्न वाटते.

अंदमान आणि निकोबार द्वीपसमूहाचे हवामान उष्णकटिबंधीय आहे. सरासरी तापमान २३° सें. ते ३२° सें. च्या दरम्यान असते. ते फार उष्णही नसते आणि फार थंडही नसते. मात्र समुद्राचे सान्निध्य असल्याने आर्द्रता मोठ्या प्रमाणात असते.

बंगालच्या उपसागरावरुन वाहणाऱ्या मोसमी वाऱ्यांच्या शाखेमुळे येथे पाऊस पडतो. पोर्ट ब्लेअरला वार्षिक सरासरी पर्जन्यमान सुमारे ३००० मिमी. इतके आहे. पाऊस या प्रदेशात मे महिन्यापासून सुरू होतो आणि डिसेंबर महिन्याच्या अखेरपर्यंत सुरू राहतो. त्या ठिकाणी नैर्ऋत्य तसेच ईशान्य मोसमी वाऱ्यांपासून पाऊस पडतो.

### ८.३.३ नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी जीवन :

स्थानिक वनस्पतींमध्ये खास समुद्रतटाजवळील हवामानात वाढणारी छोटी झाडे आणि झुडुपे आढळून येतात.

या बेटावरील परिस्थितीकी अत्यंत नाजूक आणि अद्‌वितीय आहे. कारण वनस्पती आणि प्राणिजीवन यांची उत्क्रांती एकांत वातावरणात होते. अनेक दूरवरच्या बेटांवर जगातील दुर्मिळ वनस्पती सापडतात; काही ठिकाणी वृक्षांच्या आणि प्राण्यांच्या अशा जाती आहेत की, त्या इतरत्र कुठेही सापडत नाहीत.

लक्षद्वीप बेटांचा समूह हा स्वतंत्र परिस्थितिकी प्रदेश आहे. लक्षद्वीपच्या पाणथळ जमिनी, शैलभित्ती आणि किनारे ही जिवंत प्रवाळ, पाणवनस्पती, विविध प्रकारचे मासे इ. ची मोठी भांडारे आहेत. वस्ती नसलेली बेटे महत्त्वाची आहेत. कारण येथे समुद्री कासव आणि विविध प्रकारचे पक्षी यांची पैदास होते. काटेरी मासे, तलवार तसेच डॉल्फीन मासे खोल पाण्यात, म्हणजेच खोल समुद्रात आढळतात.

अरबी समुद्रातील बेटांच्या उलट बंगालच्या उपसागरातील बेटांवर नैसर्गिक वनस्पतींची जोमाने वाढ झाली आहे. तेथे मोठ्या संख्येने प्रदेशनिष्ठ वृक्ष आढळतात. जे भारताच्या मुख्यभूमीवर सापडत नाहीत. उत्तर अंदमानात आर्द्र सदाहरित वने आढळतात आणि जसजसे दक्षिण निकोबार बेटांकडे जावे, तसतसे वनांची घनता वाढत जाते. दक्षिण निकोबार बेटांवर सदाहरितवने आढळतात. बेटांच्या अंतर्भागात असलेल्या या वनांव्यतिरिक्त किनारी भागात खारफुटीची दाट वने संपूर्ण बेटांच्या सीमेलगत दिसून येतात. व्यापारी मूल्य असलेल्या लाकडाच्या अनेक जाती अंदमानच्या जंगलात आहेत. सागापेक्षा मजबूत असलेले महोगनी लाकूड फर्निचर बनविण्यासाठी वापरले जाते. या वनामध्ये धूप आणि रूद्राक्षाची झाडे मोठ्या प्रमाणात आढळतात.

या प्रदेशातील वन्यप्राण्यांत रानडुक्कर, भुंकणारे हरीण, हत्ती व सरपटणारे प्राणी आढळतात. शिंपल्यांचे विविध प्रकार, त्यातील काही मोत्यांसारखी कांती असलेले, येथील कुटिरोद्योगांचा आधारस्तंभ आहेत; त्यापासून खूप प्रकारच्या शोभेच्या वस्तू आणि दागिने बनविले जातात.

### ८.३.४ लोकसंख्या आणि वसाहती :

या द्वीपसमूहावरील निवासी वंशदृष्ट्या केरळ किनारपट्टीतील मल्याळी लोकांसारखे आहेत. अंदमान निकोबार बेटांवर आदिवासी जमाती, जसे ग्रेट अंदमानी, जारवा, सेंटिनेलस हे आदिवासी या बेटांवरील मूळ रहिवासी आहेत. त्यांची संख्या कमी कमी होत आहे. या आदिवासींचे मुख्य व्यवसाय शिकार करणे, वनातील वस्तू गोळा करणे आणि मासेमारी करणे आहेत. त्याशिवाय स्थलांतर करून स्थायिक झालेले लोक आहेत. या केंद्रशासित प्रदेशाची राजधानी पोर्ट ब्लेअर हे मुख्य शहर आहे.

ग्रेट अंदमानी.
जारवा.
सेंटिनेलस.

### ८.३.५ आर्थिक विकास :

**शेती :**

या बेटावरील सर्वाधिक क्षेत्र नारळाच्या लागवडीखाली आहे. लक्षद्वीप हा भारतातील सर्वात जास्त नारळाचे उत्पादन करणारा प्रदेश आहे. येथील नारळात तेलाचे प्रमाण भरपूर असते. अंदमान द्वीपसमूहात भात हे मुख्य अन्नधान्याचे पीक आहे. निकोबार द्वीपसमूहात नारळ आणि सुपारी ही नगदी पिके होतात. डोंगराळ भागात आंबा, अननस, संत्री, केळी इ. फळे घेतली जातात. या बेटांवर मिरे, लवंग, जायफळ इ. मसाल्याची पिकेही होतात.

**मासेमारी :**

समृद्ध सागरी जीवनामुळे बेटावरील लोकांचे मासेमारी हे मुख्य उपजिविकेचे साधन आहे. खाजणात माशांच्या अनेक जाती उपलब्ध असल्या तरी ट्यूना, शार्क, खेकडे, कोळंबी, कालवे इ. लक्षद्वीपच्या समुद्रात मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. ट्यूनाचे लोणचे आणि इतर उत्पादने निर्यात केली जातात, ही उत्पादने अधिक लोकप्रिय आहेत.



Highlited by:- www.diac.in

## उद्योग :

लक्षद्वीपमधील प्रमुख उद्योग म्हणजे नारळाच्या शेंड्या काढणे आणि त्यापासून विविध उत्पादने बनवणे. भारत सरकार नारळाच्या शेंड्यांपासून धागे बनवण्याचे कारखाने चालवते. अंदमान-निकोबार समूहात काही छोट्या प्रमाणावर ग्रामीण हस्तकला उद्योग चालतात. या व्यतिरिक्त, तेथे शिंपले व लाकडापासून वस्तू बनवण्याचे उद्योग आहेत, लघुउद्योगात विविध प्रकारचे उपक्रम चालतात. उदा., पॉलिथिन बॅग्ज बनवणे, रंग आणि वॉर्निश, शिंपल्याच्या वस्तू इ.


## वाहतूक :

भारताच्या मुख्य भूमीपासून दूर व वेगळा असला तरी लक्षद्वीप समूह हवाईमार्गाने व जलमार्गाने चांगल्या रीतीने जोडलेला आहे. अगाती विमानतळ हा लक्षद्वीपमधील एकमेव विमानतळ आहे. तो मुख्यभूमीवर कोचीला जोडला गेला आहे. इतर बेटे हेलिकॉप्टर किंवा बोटसेवेने जोडलेली आहेत. पोर्ट ब्लेअर हे अंदमान व निकोबार बेटांचे राजधानीचे शहर चेन्नई, विशाखापट्टनम आणि कोलकात्याशी जोडलेले आहे. या केंद्रावरून भारताच्या मुख्य भूमीकडे जहाज सेवा आहे. या समूहातील एकमेव विमानतळ पोर्ट ब्लेअर येथे आहे.

## पर्यटन :

भुरळ पडणारे सृष्टिसौंदर्य आणि वेगळेपणा यामुळे लक्षद्वीप हे पर्यटकांचे आकर्षण बनले आहे. अशा लहान प्रदेशात उद्योगांची उभारणी करता येत नसल्याने सरकार पर्यटनाला सक्रिय प्रोत्साहन देत आहे. त्यामुळे उत्पन्नाचे स्रोत म्हणून त्याची मदत होत आहे. पर्यटकांना समृद्ध जलचरसंपत्तीने नयनसुख मिळते. स्कूबाडायव्हिंग, विंडसर्फिंग, वॉटरस्किइंग इ. जलक्रीडांचे प्रकार लोकप्रिय आहेत, त्यामुळे पर्यटक आकर्षित होतात.

लक्षद्वीपच्या तुलनेत अंदमान निकोबार बेटांवरील पर्यटन हे काही बेटांपुरतेच मर्यादित आहे. त्याचे मुख्य कारण म्हणजे आदिवासींची कमी होणारी संख्या, त्यांना संरक्षण देणे महत्त्वाचे आहे. बहुतेक पर्यटन हे पोर्ट ब्लेअर आणि त्याच्या जवळची बेटे यापुरतेच मर्यादित आहे.



बेट



Highlited by:- www.diac.in